भस्म जालिया नंतरे। वृक्षाचाही ठाव नुरे।
तैसा देह अनुभवे विरे। पुढे वोसरे जन्म मरण ।।२७।।

सद्गुरुंची भेट झाल्याने पूर्वकर्म संपले. अलंकार आटविला की फक्त सोनेच रहाते. झाड मुळासकट उपटले तर कांही काळ आर्द्रता राहून ती सुकल्यावर केवळ काष्ठच उरते, पाने-फुले-फळासहित वृक्ष वाळला तर अग्निच्या संपर्कात जळून केवळ भस्म उरते. सद्गुरुकृपेने पूर्वकर्माची उपाधि नष्ट होऊन केवळ संचिताचा उपभोग घेण्यापुरताच देह उरतो व तोही सरतांना जन्म-मरणाचे फेरेही संपतात. एका सद्गुरुच्या भेटीने जन्म-जन्मान्तराची सफलता मिळते.

चतुःश्लोकी भागवतात 'परमगुह्यज्ञान' कसं मिळेल याचा मार्ग नाथ स्पष्ट करतात –

हे मत (ज्ञान) नातुडे अष्टांगयोगे। हे मत नातुडे महायोगे।
हे मत नातुडे स्वर्गयोगे। शिरवात्यागे नातुडे मत।। ६४४।।

हे परमगुह्यज्ञान अष्टांगयोगाने, महायोगाने, स्वर्गकामेष्टीने अथवा संन्यास घेऊनही मिळेलच असे नाहीं असे कथन करून जप, तप, अनुष्ठान, वेदाध्ययन, महादाने, मतमतांतरे, इत्यादि कोणत्याही साधनाने मिळण्याची शाश्वति नाहीं. तर मग कशाने मिळेल याचे उत्तर ते देतात –

हे मत नातुडे कथा ऐकता। हे नातुडे कथा करिता।
हे नातुडे शास्त्रार्थां। गुरुकृपेवीण हाता नये हे मत।। ६५६।।
हे मत नातुडे क्षीरसागरीं। हे मत नातुडे वैकुंठशिखरीं।
हे मत नातुडे सगुणसाक्षात्कारीं। साम्यसमाधीवरी गुरुकृपे लाभे ।। ६५७।।
विवेक वैराग्य यथाविधी। विषय विरक्ती निरवधी।
सर्वत्र होय समबुद्धी। तै गुरुकृपा प्रबोधी हे मतसिद्धी माझी ।। ६५८।।
विवेकाचे निजनेटीं। धडधडीत वैराग्य उठी।
विषयाची काढूनी कांटी। समाधिदृष्टि समसाम्य प्रगटे।। ६५९।।
ऐशी सर्वत्र समबुद्धी। या नाव परमसमाधी।
ते समाधीवरी त्रिशुद्धी। माझ्या मताची सिद्धी गुरुकृपा।। ६६०।।

कोणत्याही साधनाचा पत्कर केला तरी त्याची सिद्धी गुरुशिवाय होऊ शकत नाहीं असे नाथांनी ठायीं ठायीं सांगितलेले आहे. अर्थात् या सर्वसाधनांचा त्याग करावा असे त्यांना सूचित करावयाचे नसून या सर्वांची परिणती गुरुकृपेवाचून फळांत होत नाही असे त्यांचे निर्वाणीचे सांगणे आहे.

# संत रामदास

लेखिका – सौ. **जयश्रीदेवी,**
मुंबई.

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वर: ।**
**गुरु: साक्षात्परं ब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नम: ।।**

मनुष्य जीवनांत गुरुची नितान्त आवश्यकता आहे. जीवन जगण्यास हवा, पाणी, अ, निवारा, ह्या चार गोष्टींची जितकी निकड आहे किंबहुना त्याहुनीही अधिक ची आवश्यकता आहे. गुरुची थोरवी आजवर अनेक संतांनी विद्वानांनी आपआपल्या ांत मांडली आहे. महाराष्ट्रात आजवर अनेक संत, थोर पुरुष होऊन गेले. त्यापैकी रामदास यांचे वेगळेपण कांही अलौकिकच आहे. ते एक संत तर होतेच परंतु गुरु, आध्यात्मिक गुरु म्हणूनही त्यांचा लौकिक मोठा आहे. समर्थ रामदास तात –

**इहलोक साधायाकारणें। जाणत्याची संगती धरणे।**
**परलोक साधायाकारणें। सद्‌गुरु पाहिजे।।** द.-१२. स.-३. ओवी २

आमचे एकनाथ महाराज जगाला खडखडीत शब्दात विचारतात –

''**जरी ग्रंथचि होती गुरु। तरी कां घेणे लागे अवतारु।।**

हे तर सत्यच आहे. गुरुची आवश्यकता मनुष्य जीवनांत पावलोपावली जाणवत ते. तशी इतर प्राणीमात्रात आढळून येत नाही. याचे कारण पशूंना त्यांचे पशुत्त्व न्मत:च प्राप्त होत असते. माशांना पोहणे शिकण्यास कोणत्याहि ट्रेनिंग स्कूलमध्ये वे लागत नाही किंवा सिंहाला हत्तीच्या गण्डस्थलावर झेप घेण्यास कुठे शिकावे गत नाही. ते त्यास जन्मत:च प्राप्त होत असते. परंतु माणसाला मात्र जन्माला ल्यापासून सर्वच गोष्टी शिकाव्या लागतात. लहानपणींच्या तहान-भूक-झोप ह्या दानुसार लावावयाच्या सवयी आई जागरूकतेने लावण्याचे काम करीते. हे वर-वर णारे दाई सारखे काम मनुष्यावर सुसंस्कार घडवून जाते म्हणूनच आपल्या धर्मात ईला प्रथम गुरुचा मान मिळाला आहे. आपल्या पूर्वजांनी आपणांस हेच सांगितले हे- ''**मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव।** असा क्रम आहे.

अशाप्रकारे लहानपणी माता-पिता नीतिसंस्काराचे धडे मुलाला देऊन विताव. त्यानंतर विद्याध्ययनासाठी आचार्य लागतात. आजकाल त्यासाठी शाळा,

महाविद्यालयें असल्याने तेथून माणूस विद्यासंपन्न होऊन बाहेर पडतो. पण केवळ विद्यासंपन्न म्हणजे शहाणा नव्हे. अथवा तो शहाणा असतोच असे नाही. शहाणपण हे शिकल्यावाचून येत नाही. केवळ वय वाढले म्हणजे शहाणपण येतेच असे नाही. उलट जर वाढत्या वयाबरोबर शहाणपण आले नाही तर त्याबाबतीत आपण चटकन् म्हणतो, **''उंच वाढला एरंड। त्यासी कुणी म्हणे का इक्षुदंड।।''** म्हणजे 'शहाणपण हे शिकल्यावाचून येत नाही'. (डॉ. पारनेरकर–परिसरांत) शहाणपण शिकण्यासाठी काही पुस्तके छापली गेली नाहीत. तर हे अनुभवातूनच शिकावे लागते. ते त्यालाच प्राप्त होते, ज्याला स्वतःच्या चुका समजावून घ्यायच्या असतात. नुसत्या समजावून नव्हे तर त्या सुधारायच्या असतात. तोच शहाणा. चुका होणे हा मनुष्य स्वभाव. परंतु त्या सुधारणे हे प्रगतीचे लक्षण. त्या करू म्हटल्याने होत नाही. कारण माणसाला नेहमी दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ चटकन् दिसत, पण स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही. म्हणून आपल्याला आपली चूक निदर्शनास आणून देणारा माणूस लागत असतो. ती जो दाखवून देतो त्यासच गुरु म्हणतात. यातूनच गुरुसंस्था, गुरुपरंपरा निर्माण झाल्या. आज अजूनही त्या टिकून आहेत.

अशाप्रकारे मनुष्य आपले जीवन जगत असताना काही विशिष्ट वयोमर्यादेत आल्यावर त्याचे त्यास रिकामपण जाणवत असते. काहीतरी कार्य करावे तर सुचत नाही. यातच बराच कालावधी जातो. ठरवल्याप्रमाणे नियमित घडत नाही. त्यामुळे त्याचे फळ मिळत नाही. म्हणून समर्थ रामदास म्हणतात– **''अधी कर्म ते कर्म कांहीं घडेना। घडे कर्म ते पुण्य गांठी पडेना।।''** तेव्हा ठरलेले कार्य बिनचूक योग्य वेळी होण्यासाठी गुरुची नितान्त गरज असते. म्हणूनच आपण गुरुकडे धाव घेतो. त्यामुळे जीवनांत येणारे बिकट प्रश्न सोडविता येतात. संभ्रम निर्माण करणाऱ्या परिस्थितीत कोणता मार्ग स्वीकारावा हा निर्णय बिनचूक घेण्यास मदत होते. या उलट जर गुरुची मदत नसेल तर मार्ग सापडत नाहीच शिवाय वेळही वाया जातो. म्हणूनच तुकाराम महाराज सांगतात– **''सद्गुरुंवाचुनी सापडेना सोय। धरावे ते पाय आधी आधी।।''**

यानंतरचा जीवनाचा उत्तरार्ध सुरु होतो. त्यावेळी विचारानुसार वागून विकारावर मात करण्याची मानसिक तयारी असते. अशावेळी आध्यात्मिक गुरुची गरज निर्माण होते. परंतु गुरु म्हणजे देव नव्हे हे आधी पटवून घ्यावे लागते. कारण देवाच्या पूजेअर्चेत आपण काही कमी जास्त केले तरी देव काही बोलणार नाही हे आपणास ठामपणे माहीत असते. आपण श्रद्धेचे भक्तीचे गोडवे गाऊन चक्क लबाड्या खोटेपणा करतो. परंतु देव कधीच बोलत नाही. परंतु गुरु मात्र वावगेपण बिलकुल खपवून घेत नाही.

आज्ञापालनात कसूर झाली की गुरु रागावणार. हे लक्षांत ठेवलेच पाहिजे. कारण गुरुला शिष्याची उन्नती साधावयाची असते. त्यासाठी त्यावर प्रेम करून चालत नाही. सतत चूक दाखवून ती सुधारून घेण्याची जबाबदारी गुरुवर असते. असे जो करवून घेतो तोच खरा गुरु नाहीतर केवळ शिष्याकडून मोठेपणाची अपेक्षा धरणारे गुरु आज बरेच आहेत जे 'बुवा' या मालिकेत बसतात. अशांना चमत्काराने नमस्कार घ्यायचा असतो. त्यावर रामदासांनी म्हटले आहे– "**शिष्यास न लाविती साधन। न करविती इंद्रियदमन। ऐसे गुरु अडक्याचे तीन। मिळाले तरी टाकावे।।२१।।**" (दशक-५-२-२१)

यासाठी समर्थ रामदास म्हणतात, गुरुसुद्धा पारखून मग ठरवावा लागतो. त्याची पारख अथवा ओळख कशी पटवून घ्यायची यासाठी त्यांनी आपल्या दासबोध ह्या महान ग्रंथात 'सद्‌गुरुची लक्षणे' या समासात फारच सुंदर वर्णन केले आहे. ते म्हणतात –

**"जो ब्रह्मज्ञान उपदेसी।अज्ञान अंधार निरसी।**
**जीवात्मया-शिवात्मयासी। ऐक्यता करी।।** ५-३-९
**विघडले देव आणि भक्त। जीव-शिवपणे द्वैत।**
**तया देवभक्ता येकांत। करी तो सद्‌गुरु।।१०।।**
**प्राणी माया जाळी पडिले। संसार दुःखे दुखावले।**
**ऐसे जेणे मुक्त केले। तो सद्‌गुरु जाणावा।।१२।।**
**मुख्य सद्‌गुरुंचे लक्षण। आधी पाहिजे विमळज्ञान।**
**निश्चयाचे समाधान। स्वरूप स्थिती।।४५।।**
**याहीवरी वैराग्य प्रबळ। वृत्ति उदास केवळ।**
**विशेष आचारे निर्मळ। स्वधर्म विषई।।४६।।**
**म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन। स्वधर्मकर्म आणि साधन।**
**कथानिरूपण श्रवणमनन। नीतिन्याय मर्यादा।।५२।।**
**यामध्यें येक उणे असे। तेणे ते विलक्षण दिसे।**
**म्हणोनि सर्वही विलसे। सद्‌गुरुपासी।।५३।।**
**तो बहुतांचा पाळणकर्ता। त्यास बहुतांची असे चिंता।**
**नानासाधने समर्था। सद्‌गुरुपासी।।५४।।**
**नाना सद्विद्येचे गुण। याहीवरी कृपाळूपण।**
**हे सद्‌गुरुंचे लक्षण। जाणिजे श्रोती।।७३।।**

याप्रमाणे स्वतःची प्रगती साधणारा गुरुची पारख करूनच गुरुकडे जाईल. परंतु

तेथेही गेल्यानंतर सुरुवातीस माणसाची थोडीशी फसगत अशी होते की त्याला वाटते, गुरु केला की काम झाले. तो लगेच आपल्यावर देवकृपा घडवून आणील. पण हे इतके बटण दाबले की लाईट लागण्याइतके सोपे नाही. बटण दाबले की लाईट लागतो पण तेथेही फिटींगची आवश्यकता असते. त्याप्रमाणे बटण म्हणजे गुरु तर प्रकाश म्हणजे देवकृपा मानली तर फिटींग म्हणजे आपली योग्यता. ती साधली की गुरु आपोआप कनेक्शन जोडून देतो. म्हणूनच गुरुचा महिमा अगाध आहे. गुरुमहिमा किती मोठा याचे सुंदर वर्णन भक्त सूरदास आपल्या दोह्यामध्ये करतात–

**गुरु गोविंद दोऊ मिले। किसके लागू पाँव।।**
**शीश नमाऊँ सत् गुरु तें। जिहिं गोविंद दियो मिलाय।।**

अशाच मालिकेतील समर्थ रामदास हे एक मोठे गुरु होऊन गेले. त्यांचे लक्षात राहण्यासारखे वेगळेपण म्हणजे त्यांनी आधी केले मग सांगितले:

**वर्तल्यावीण बोलणे। ते शब्द मिथ्या।।** दा.१२-१०-३

स्वतः तसे न वागताना इतरांना तो उपदेश करणे खोटे बोलणे होय. असे ते उत्तम पुरुष विवेचनाच्या समासात ठणठणीतपणे सांगतात. "**हे प्रचितीचें बोलिलें।** आधीं केलें मग सांगितले।। (११-१०-२४) **बोलण्यासारिखें चालणें। स्वयें** करूनि बोलणें। असे, जो करील, '**तयाचीं वचनें प्रमाण। मानिती लोक।।**' (१२-१०-२९) स्वतः समर्थसुद्धा हेच सांगतात– '**सद्गुरुविण ज्ञान कांहीं। सर्वथा होणार नाहीं।** (५-१-२१) तेथे स्वतःच्या शहाणपणाची घमेंड व्यर्थ होय. तुम्ही इतर कितीही साधने करा, गुरुकृपेवांचूनी ती सारी निष्फल होत.

**करुनि नाना सायास। केला चौदा विद्यांचा अभ्यास।।**
**रिद्धि सिद्धि सावकाश। वोळल्या जरी।।** ५-१-३३
**तरी सद्गुरुकृपेविरहित। सर्वथा न घडे स्वहित।**
**येमपुरीचा अनर्थ। चुकेना येणे।।३४।।**
**जव नाही ज्ञानप्राप्ती। तव चुकेना यातायाती।**
**गुरुकृपेविण अधोगती। गर्भवास चुकेना।।१५।।**
**ध्यान धारणा मुद्रा आसन। भक्ती भाव आणि भजन।**
**सकल हि फोल ब्रह्मज्ञान। जव ते प्राप्त नाही।।३६।।**
**सदगुरुकृपा न जोडे। आणि भलतीचकडे वावडे।**
**जैसे आंधळे चाचरोन पडे। गारीं अणि गडधरां।।३७।।**
**जैसें नेत्रीं घालितां अंजन। पडे दृष्टीस निधान।**

ऐसे सद्गुरुवचनें ज्ञान -। प्रकाश होये।।३८।।

थोडक्यात सांगायचे तर –

सद्गुरुविण जन्म निर्फळ। सद्गुरुविण दु:ख सकळ।
सद्गुरुविण तळमळ। जाणार नाही।।३९।।

समर्थांनीं पहिल्या दशकाच्या चवथ्या समासात श्रीसद्गुरुंचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, आपल्याला श्रीगुरुपदाचे वर्णन शब्दात करता येण्यासारखे नाही. ती म्हणण्यापलिकडे जसे ब्रह्मस्वरूपाचे वर्णन वेदांनाही करविलें नाही. तद्वत्च गुरुंचे वर्णन करताना वैखरी कुंठित होते. ''गुरु: साक्षात् परब्रह्म'' हेच खरे.

सद्गुरुहून देव मोठा। जयास वाटे तो करंटा।। ५-३-४०
गुरुदेवासी बराबरी। करी तो शिष्य दुराचारी।। ५-३-४३

असे जरी आहे तरी, ज्याप्रमाणे ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी आपण नेहमी करतोंच आपआपल्या आवडीप्रमाणे श्रीगुरुपदाचे वर्णन करण्याचा प्रयत्न कोणी केल्यास वावगे नाही! ब्रह्म म्हणून जे काय म्हणतात ते इंद्रियांना अगोचर आहे. ते हे आमचे गुरुब्रह्म नाही! ज्यांना ब्रह्म पहावयाचे असेल त्यांनी श्रीसद्गुरुपद पहावे!

श्रीसमर्थांचे चरित्र आपणांस जे माहीत आहे त्यावरून असे दिसते की, सद्गुरुंचे लक्षण म्हणजे हे की, जे कोणी श्रीचरणी अनन्यभावाने लीन होतात त्यांचा तत्काळ उद्धार करतात. सद्गुरु स्वत: निश्चिंत असून साऱ्या विश्वाची चिंता करीत असतात. शरणागताची सद्गुरुंनी उपेक्षा केल्याचे एकही उदाहरण नाही! प्रपंचसागरात बुडणाऱ्या जीवाला परतीराला घेऊन जाण्याचे सामर्थ्य एकटच्या सद्गुरुंत असते.

वासनानदी महापुरीं। प्राणी बुडतां ग्लांती करी।
तेथे उडी घालूनि तारी। तो सद्गुरु जाणावा।। ५-२-१३
जीव येकदेशी बापुडें। तयास ब्रह्मचि करी रोकडें।
फेडी संसारसांकडे। वचनमात्रें।। ५-२-१६

त्यांचा स्वत:चा प्रपंच सुटून साऱ्या ब्रह्मांडाचा त्यांना प्रपंच जडलेला असतो! त्यांची सारी कर्मे लोकांसाठी असतात. लोकांना सद्बुद्धि लागावी, सन्मार्ग लागावा म्हणून सद्गुरु स्वत: अंतरी पूर्ण विरक्त असून बाह्यत: अत्यंत निष्ठेने सर्व लोकाचार करीत असतात. समर्थांनी सद्गुरुचे दुसरे मोठे लक्षण म्हणजे त्यांच्या ठिकाणी विचार, उच्चार आणि आचार यांची एकवाक्यता झालेली असते. सद्गुरु ओळखण्याचे आणखी

एक लक्षण असे आहे की, काम-क्रोधादि षड्रिपु त्यांनी जिंकलेले असतात.

आजच्या विज्ञानयुगात सर्व गोष्टींचे भांडार ग्रंथात लिहून ठेवलेले असते गुरुची गरज काय? असा प्रश्न डोक्यात घोळू लागतो. त्यासाठी समर्थ सांग पुस्तकात सारे ब्रह्मज्ञान ओतप्रोत भरलेले असेल पण ते आपल्याला प्राप्त हो श्रीसद्गुरुकृपाच झाली पाहिजे. जसे–

भांडारगृहें भरली। परी असती आडकिली।
हातास न येतां किल्ली। सर्व हि अप्राप्त।। ७-२-१३

ती किल्ली म्हणजे दुसरी तिसरी कोणती नाही.

सद्गुरुकृपा तेचि किल्ली। जेणे बुद्धि प्रकाशली।
द्वैतकपाटे उघडली। येकसरीं।। ७-२-१५

ह्या सर्व मागच्या व पुढच्या गोष्टी विचारात घेऊन श्रीसमर्थ निश्चयपूर्वक आहेत.

भुमीभार जीणें तुझे गुरुवीणें।
वचनें प्रमाणें जाण बापा।।
जाण बापा गुरुवीण गति नाही।
पडसी प्रवाहीं मायाजाळीं।।३।।

म्हणे दास सायास त्याचे करावे।
जनी जाणता पाय त्याचे धरावे।।
गुरुअंजनेवीण ते आकळेना।
जुने ठेवणे मीपणें ते कळेना।।

।।जय जय रघुवीर समर्थ।।

बाबा अहंकारनिशी घनदाट। गुरुवचनी फुटली पहाट।
माता भक्ति भेटली बरवंट। तिने मार्ग दाविला चोखट गा।
नरहरी रामा गोविंदा वासुदेवा।।

- संत नामदेव महाराज- 'वासुदे

# संत तुकाराम

- सौ. प्रविणा कांबळी,
मानद सहाय्यक कार्यकारी संपादिका

सदेह वैकुंठाला जाण्याची किमया करणारा आणि त्यांच्या अभंगवाणीला पाचवा वेद ह्या सार्थ उपमेची बिरुदावली प्राप्त होण्याचं भाग्य लाभलेला संत तुकाराम म्हणजे परमेश्वराने प्रसन्न होऊन सदासर्वकाळासाठीं महाराष्ट्राला दिलेली अमोल रत्नाची जणू देणगी !

## तुकोबांचे गुरु

परमेश्वराची अतीव तळमळ लागलेल्या भक्ताला मार्गदर्शन करण्यासाठी परमेश्वर एखाद्या सद्गुरुला पाठवितो असा अनेक संतांचा अनुभव आहे.

देवा, मी तुला कसा जाणून घेऊं ? तू माझ्या अनुभवाला कसा येशील ? तूं सगुण आहेस की निर्गुण आहेस ? संसार तरून जाण्यास काय उपाय करूं ? तुझी भक्ती व सेवा कशी करू ? कोणी सद्गुरु मिळेल तर बरें, पांडुरंगा तूंच मला सहाय्य कर. अशी तळमळ लागल्यावर तुकारामावर सद्गुरुंची कृपा झाली. तुकाराम महाराज म्हणतात –

सद्गुरुरायें कृपा मज केली।
  परि नाहीं घडली सेवा कांही।।
सापडविले वाटे जातां गंगास्नाना।
  मस्तकीं तो जाणा ठेविला कर।।
भोजना मागती तूप पावशेर।
  पडिला विसर स्वप्नामार्जी।।
राघव केशव चैतन्य केशव।
  सांगितली खूण मालिकेची।।
बाबाजी आपुले सांगितलें नाम।
  मंत्र दिला रामकृष्ण हरि।।
माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार।
  केला अंगीकार तुका म्हणे।।
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।
  गुरुसाक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ।।

गुरुची महती सांगणाऱ्या वरील पंक्ती आपल्या सर्वांना ठाअुकच आहेत. परमात्वतत्त्व जाणून घ्यायचे असेल, योग्य मार्गाने परमेश्वरप्राप्ती करून घ्यायची असेल, परमेश्वराकडे पोचण्यासाठी अनावश्यक भटकंती टाळायची असेल तर गुरुला शरण जाऊन त्याचे मार्गदर्शन घेऊन हरिनामांत तल्लीन होऊन मळलेल्या वाटेने आपण जायला हवे ; हाच ईश्वरप्राप्तीचा योग्य मार्ग. गुरुबद्दल आत्यंतिक आदर आणि प्रेम व्यक्त करतांना तुकाराम महाराज आपल्या अभंगात म्हणतात.

**गुरुचियामुखें होईल ब्रह्मज्ञान।**
**न कळे प्रेमखूण विठोबाची।।**
**वेदांते विचारा पुराणातें पुसा।**
**विठोबाचा कैसा प्रेमभाव।।**
**तुका म्हणे सांडा जाणिवेचा शीण।**
**विठोबाची खूण जाणती संत।।**

गुरुबद्दल अनादर व्यक्त करणाऱ्या लोकांना तुकोबांनी अतिशय स्पष्टपणें फटकारलें आहे. तुकोबांच्या कवित्वासंबंधी अशी एक आख्यायिका रूढ आहे की संत नामदेवांनी शतकोटी अभंग रचण्याचा संकल्प केलेला होता पण नामदेवांच्या हयातींत तो पुरा झाला नाहीं. संत नामदेवांनी तुकोबांच्या स्वप्नांत येऊन तो संकल्प पुरा करण्याचा जणूं आदेश दिला व तुकोबांनी तो आदेश शिरोधार्य मानून शेवटपर्यंत अभंग रचना करत राहिले.

**तुकोबाचे संतप्रेम**

तुकाराम म्हणजे भक्ति, विरक्ती व अनुभूति यांचा चिरंजीव ज्ञानकोश. शेवटीं आकाशाएवढ्या झालेल्या तुकोबांस सुरवातीलाच सांसारिक आपत्तींशी झगडता झगडता वैराग्य प्राप्त झालें. संसारांतील एकमेव सार म्हणजे पांडुरंग. परमेश्वराची गांठ घालून देणारे एकमेव वाटाडे म्हणजे संत आणि त्यास अनुसरून स्वत:चे जीवन व्यतित करणें हा स्वधर्म. विलक्षण श्रद्धेनें त्यांनी त्याचा पाठपुरावा केला.

**जे कां रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।।**
**तोचि साधू ओळखावा। देव तेथेंची जाणावा।।**

संतांची वरील शब्दांत व्याख्या करणाऱ्या तुकोबांना साधूसंतांबद्दल कमालीचा आदर. त्यांच्या पायांतील पायतण होण्याची, त्यांच्या पादुका खांद्यावर घेण्याची, त्यांच्या अंगणांतील केरसुणी होण्याची तुकोबांची मनोमन तयारी. **'मुखी अमृताची वाणी आणि देह देवाचे कारणी'** लावणारे हे संत म्हणजेच **'शुद्ध बीजापोटीं**

जणूं फळें **रसाळ गोमटीं'**. गंगाजळासारखें शुद्ध मन असलेलीं, सर्वांग निर्मळ असलेली अशी ही संतमंडळी आपल्या घरीं आली की दिवाळी दसरा आल्याचा त्यांना आनंद होई.

**तुकारामाचें साधक जीवन**

तुकारामाचें साधक जीवन अतिशय समृद्ध होतें. प्रत्येक साधकाला आपलें प्रतिबिंब त्यांत स्पष्ट दिसतें. परमार्थातील वाटचालीची परिणति परमेश्वराच्या साक्षात्कारांत झाली तरच साधकाला खरंखुरं समाधान लाभतं. पूर्णत्व प्राप्त करण्यासाठी साधकाला चढत्या भाजणीच्या अवस्थांतून मार्गक्रमण करावें लागतें. प्रत्येक साधकालाहि अशाच अवस्थेंतून जावं लागणार याचा जणूं वस्तूपाठ तुकोबांच्या अभंगातून आपल्याला मिळतो.

आपण मनोभावें पांडुरंगाची सेवा करत असतां त्यानें स्वप्नातहि येऊन दर्शन देऊं नये याबद्दल तुकोबा अस्वस्थ होतात. साक्षात्कार होण्याच्या आधीं तुकोबानें देवाशीं केलेला युक्तिवाद, आदळआपट, प्रसंगी कडाक्याचे भांडण, परमेश्वराची निर्भत्सना, देवास वाहिलेली लाखोली यावरील अभंग अतिशय सुंदर मनोवेधक असे झाले आहेत.

पांडुरंगाजवळ तुकोबांचे मागणें **'सदा माझे डोळा जडो तुझी मूर्त्ति। रखुमाईच्या पति सोयरिक। गोड तुझें रूप गोड तुझें नाम। देई मज प्रेम सर्वकाळ।। हेंचि दान देवा। तुझा विसर न व्हावा।'**

पांडुरंग सगुण दर्शन देत नाही, उशीर करतोय हें पाहून तुकोबांनी पांडुरंगाशी केलेला युक्तिवाद अतिशय मनोज्ञ झालेला आहे.

पांडुरंग दर्शन देत नाहीं याचा राग येऊन ते प्रत्यक्ष पांडुरंगाला फटकारतात. ते म्हणतात, आम्हां संतांमुळेच तर तुला देवपण आलेलें आहे, नाहीतर तुला विचारतो कोण?

**जेणें तुज आलें रूप आणि नांव।**
**पतित हे दैव तुझे आम्हीं।।**
**नाहीं तरी तुज कोण हो पुसतें।**
**निराकारीं तेथें एकाएकी।।**

आणि म्हणतात की अंधाराला शोभा प्रकाशाच्या अस्तित्वामुळें प्राप्त होते. कोंदणांत माणिक बसवलें तरच त्याची प्रभा फांकून लोकांना जाणवते. रोगी आहेत

म्हणून तर धन्वंतरी उजेडांत येतात. विषाचा गुण माहीत असतो म्हणून तर अमृताला मोल प्राप्त होते. पितळेच्या अस्तित्वामुळें सोन्याला उच्चपण प्राप्त होते. त्याचप्रमाणे आम्ही आहोंत म्हणून तर तुला देवपण प्राप्त झालेले आहे.

मनोभावें रात्रंदिवस परमेश्वराच्या सेवेत लीन होणाऱ्या आणि त्याच्या दर्शनाचा ध्यास लागलेला तुकारामासारखाच अलौकिक भक्त देवाला फटकारूं जाणे. माझ्याकडून सेवा करून घेतोस पण दर्शन देत नाहीस. तुझी ठकाठकी चालणार नाही. माझा तळतळाट घेतोस तुझें वाटोळें होईल. उभ्या बाजारांत तुझें घोंगडे हिसकावून घेईन. देवाला त्याच्याशीं सलगी करून एवढें बोलून घेणारा भक्त तुकारामाशिवाय भेटला नसेल. परमार्थमार्गांत किती कमालीची सहनशीलता धरावी लागते याचे तुकाराम हे अनन्यसाधारण उदाहरण होय.

भक्तिमार्गांतील अनेक अडचणी पार केल्यावर तुकोबांना साक्षात्कार झाला. तुकारामाच्या भजनाच्या वह्या धर्ममार्तंडांनी इंद्रायणी नदींत फेकल्या. देवाला कौल लावण्यासाठी तुकारामानें उपोषण केलें. तेरा दिवसानंतर भजनाच्या वह्या कोरड्या स्थितींत मिळाल्या. परमेश्वराच्या आज्ञेनें पाण्याला आपला भिजविण्याचा धर्म सोडून द्यावा लागला. देवानें तुकोबांस दर्शन देऊन कृतार्थ केले.

त्यांच्या कीर्तनांत तत्कालीन सर्वच विषयांचा परामर्श घेतला जाई. लोकांना उपदेश करीत कीर्तनांत त्यांची कायाच मुळीं ब्रह्ममय होई. तुकोबांना पांडुरंगाने आपल्या रंगाने रंगविले असा श्रोत्यांना भास होई. धर्मरक्षक वीरांना मार्गदर्शक ठरतील रणांगणावर जाणाऱ्या वीरांना स्फूर्तिप्रद ठरतील असे पाईकीचे अभंग लिहिले. कीर्तनांच्या माध्यमानें तुकोबांनी त्याकाळीं फार मोठी जनजागृती केली.

साक्षात परमेश्वर आपल्या सर्व वैभवासह तुकोबांना माहेरी घेऊन जाण्यासाठी पुष्पक विमान घेऊन आले.

**'दिसो नये जना ऐसा करा नारायणा'** अशी इच्छा व्यक्त करणाऱ्या तुकोबांस, चिर विश्रांतीसाठी स्वतःच्या पायाशीं लपव देवा अशी मनोमन इच्छा व्यक्त करणाऱ्या या विश्वसंतास ते सदेह वैकुंठास घेऊन गेले.

यातलं सोनं

बाबांचे गुरु

# गोपाळराव केशवराज बाबासाहेब महाराज

(श्री साईलीला, जुलै १९८१ अंकावरून)

श्रीसाईबाबांचे निकटचे शिष्य श्रीदासगणू महाराज यांनी भक्तलीलामृत या ग्रंथात आद्य संत श्री गोपाळराव केशवराज बाबासाहेब महाराज हे साईबाबांचे गुरु सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. पण पुरेशी माहिती न मिळाल्यामुळे त्यांचे जगाने कदाचित मान्य केले नसेल. श्रीसाईबाबा व त्यांचे गुरु यांना सांधणारा म्हणजे दासगणू महाराज. त्यांनी रचलेल्या 'संतकथामृत' ग्रंथात श्रीसाईबाबांच्या वर एक अध्याय (५७ वा) लिहिलेला असून सदर ग्रंथ १९०८ मध्ये परभणी मोगलाई रियासतमध्ये प्रकाशित झाला.

दासगणू महाराजांचा व साईबाबांचा दाट स्नेह होता. त्यांनी पोलीस खात्यातील सोडावी असा साईबाबा त्यांना नेहमी आग्रह करीत. शेवटी त्यांनी या नोकरीचा मा दिला. त्यानंतर बाबांनी त्यांना संतचरित्रे लिहिण्याची आज्ञा केली. या रून त्यांनी वरील दोन ग्रंथ लिहिले.

## बाबांचे गुरु

श्री गोपाळराव केशवराज बाबासाहेब यांचा जन्म 'जांब' या गावी झाला. जन्मासंबंधी अशी एक आख्यायिका प्रचलित आहे की, त्यांच्या वडिलांना जांना बरेच दिवस मूलबाळ होत नव्हते. याकरिता त्यांनी अनुष्ठान करून श्री शास प्रसन्न करून घेतले व त्यांच्याकडून पुत्रप्राप्तीचा वर मागून घेतला. शांनी वर दिला तो असा की, पूर्वीचे काशीचे रामानंदस्वामी तुझ्या घरी जन्म आणि तेच गोपाळराव बाबासाहेब नावाने लौकिकास येतील.

मुंज, विवाह वगैरे झाल्यावर धर्मार्जन करण्यासाठी गोपाळराव घरातून बाहेर फिरता फिरता ते सेलूस (जिल्हा परभणी) आले (इ. स. १८३०). त्यावेळी वताने बांधलेल्या दोन तीन झोपड्याच फक्त दिसत होत्या. गोपाळरावांना यास जागादेखील नव्हती. पण त्यांनी मनाशी ठरविले की, आपणास रहावयास जागा योग्य अशी आहे.

मग त्यांनी क्षणभरही न थांबता कामास सुरुवात केली. तेथील गढीचे डाग व दुरुस्तीचे काम त्यांनी सुरू केले. आजूबाजूच्या लोकांना आणून तेथे रहाव्य त्यांनी उद्युक्त केले. स्वकर्तृत्वाने त्यांनी पूर्वीच्या 'सेलवाडी'ची सेलू केली व परगण्यामध्ये जहागिरी आणि देशमुखी मिळविली. गोपाळराव तेथील जमेदार झा परंतु सर्व लोकांशी ते रुबाबाने न वागता प्रेमाने वागत.

## विचित्र घटना

एक दिवस एक विचित्र घटना घडली. त्यांनी दुरुस्त केलेल्या गढीमागे स्त्री शौचास येऊन बसली होती. ती स्त्री तरुण होती. दिसावयास अतिशय वेळ सायंकाळची. सूर्य मावळतीकडे झुकलेला. नेमके त्यावेळीच गोपाळराव बुरु गेले अन् सहज त्यांची दृष्टी त्या तरुण स्त्रीवर गेली. त्या स्त्रीला पहाताच ते काही विसरुन विस्मयाने आश्चर्यचकित होऊन गेले. ते अलौकिक सौंदर्य त्या उभे राहिले. डोळ्यांसमोर फक्त ती स्त्रीच दिसू लागली व त्यांची कामवासना उफ वर आली.

तेवढ्यात ते भानावर आले. थंड वाऱ्याची झुळुक त्यांच्या घामाने ओथंबले शरीरास लागली. मग ते स्वत:लाच दोष देऊ लागले, 'अरेरे! किती मी पापी, धि असो. एका परस्त्रीला पाहून मी मोहवश व्हावे! केवढा हा अध:पात!' तत्काळ त मनाशी एक कठोर निश्चय केला व तत्क्षणीच ते खाली देवघरात आले. तेथे पड दाभण उचलले. 'नको हे पापी डोळे' म्हणून त्यांनी दोन्ही डोळे फोडून टाकले. तेव त्यांच्या मनाला शांती मिळाली.

गोपाळरावांनी डोळे फोडून घेतले ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पस लोकांच्या झुंडीच्या झुंडी गोपाळरावांना पहावयास गर्दी करू लागल्या. लोक काही काही बोलू लागले. त्यांना वेड लागले असावे, उगीच सुखासुखी कुणी फोडून घेईल काय? असे ते बोलू लागले. याउलट घडलेल्या प्रकाराने काही लो महाराजांविषयी आदरभाव वाढीस लागला. तेथून पुढे लोक त्यांना महाराज लागले. दूरदूरचे लोक त्यांच्या दर्शनास येऊ लागले.

एक दिवस एक अंध स्त्री त्यांचे दर्शन घ्यावयास आली. तिने महार पाय धरले व मला दृष्टी द्यावी, असे ती महाराजांना विनवू लागली. 'हे दयास मला माझी दृष्टी परत मिळवून दे. तोपर्यंत हे पाय मी सोडणार नाही.' तिची व अढळ विश्वास पाहून महाराजांच्या हृदयात दया उत्पन्न झाली. त्यांनी जव तिखट कांडीत बसलेल्या मोलकरणीजवळून मूठभर तिखट घेतले व त्या स्त्रीच्या डोळ्यात घातले. चमत्कार असा झाला की, त्या स्त्रीला पुन्हा स्पष्ट दिसू लाग यामुळे त्यांची कीर्ती आणखीनच वाढली.

## बाबांच्या जन्माचा संदेश

काही दिवसांनी महाराजांनी काशी यात्रेस जाण्याचे ठरविले. सोबत बरीच मंडळी निघाली. काशीहून महाराज गया, प्रयाग, कुरुक्षेत्र, वृंदावन, गोकुळ, मथुरा, द्वारका, सोमनाथ, प्रभासपट्टन, जुनागड करून अहमदाबाद येथे आले. तिथे सुहाग शहाचे दर्शन घेण्यासाठी महाराज दर्यात गेले; तो तेथे एक अद्‌भुत प्रकार घडला. महाराज दर्यात येताच कबरीतून एक आवाज यायला लागला, 'सलाम अलंक.' 'हे पूर्वजन्मीच्या भक्तश्रेष्ठा रामानंदा, तुम्ही अजून मला विसरला नाहीत. आपण मोगलाईत देशमुख झाला असला तरी मी देखील तुम्हास ओळखले आहे. हे दयासागरा, सेलूजवळ १० मैलांवर पाथरी नावाच्या गावात तुमचा शिष्य कबीर जन्म घेणार आहे.' यानंतर आवाज यायचा बंद झाला. बरोबरचे लोक हा प्रकार पाहून आश्चर्यचकित झाले पण महाराजांना हे सर्व ज्ञात होते.

पुढे महाराज सेलूस परत आले. एके दिवशी पाथरीहून एक मुलगा आईला बरोबर घेऊन गोपाळरावांकडे आला. त्यांनी त्यांना आनंदाने आश्रय दिला. गोपाळरावांना उत्तमपैकी संस्कृत येत होते. त्याचा लाभ त्या मुलाला देखील झाला. महाराज त्याला आपल्या जवळील सर्व विद्या शिकवत राहिले व योगासनाचे व ध्यानधारणेचे धडे देत राहिले. मुलगा कुशाग्र बुद्धीचा असल्यामुळे सर्व आत्मसात करीत गेला. त्यामुळे महाराज जास्तीत जास्त वेळ त्याच्यासाठी खर्च करू लागले.

## बाबांच्या खुनाचा प्रयत्न

गोपाळराव जनमान्यता पावलेले महाराज होते. त्यामुळे त्यांचा शिष्य व चाहता वर्ग निर्माण झालेला होता. त्यांना पूर्वी वेळ मिळत होता. पण हा मुलगा आला तेव्हापासून त्यांच्या सहवासाचा मंडळींना कमी लाभ होऊ लागला. हे सर्व त्या मुलामुळेच घडू लागले म्हणून सहाजिकच त्या मुलाबद्दल त्यांच्या मनात द्वेषाची भावना मूळ धरू लागली. हे बाबासाहेबांच्या लक्षात आले. त्यामुळे ते त्या मुलाला घेऊन त्यांच्या मालकीच्या उमरखेडच्या किल्लेवजा गढीवर रहावयास गेले.

मुलाची जातपात माहीत नाही, पण तो यवन असावा असा संशय व महाराज तर ब्राह्मण. या दोघांचे घनिष्ट संबंध त्यांच्या शिष्यांना रुचण्यासारखे नव्हते. तशात बाबासाहेब त्या मुलाला घेऊन सेलू सोडून निघून गेल्याचा परिणाम भक्त मंडळीवर फारच विपरित झाला. त्यांनी मुलाला जिवे मारण्याची योजना आखली.

निवडक लोक मिळून उमरखेडला गेले. एका रात्री बाबासाहेब मुलाला घेऊन निजले असता संधी साधून त्यांनी त्या मुलास मारण्यासाठी त्याच्या मस्तकावर दगड घातला. मोठी वीट घातली असेही म्हणतात याच विटेचा तुकडा बाबांच्या समाधीत ठेवण्यात आलेला आहे. पण तो चुकून मुलाऐवजी बाबासाहेबांनाच लागला. त्यांच्या

डोक्याला जखम होऊन रक्ताची धार लागली. रक्तस्त्राव थांबविण्यासाठी त्या मुलाने बाबासाहेबांचे उपरणे त्यांच्या डोक्याला बांधले. ते सर्व रक्ताने भरले.

डोक्यात दगड घालण्यामागे कोणाचे हात आहेत व त्यांचा हेतू काय हे त्या मुलाला कळायला वेळ लागला नाही. आपल्यामुळे गुरुला त्रास झाला ह्याचे त्या मुलाला अतोनात दु:ख झाले. आपल्याला बाबासाहेबांजवळ राहू देण्याची लोकांची इच्छा नाही, पुढेही असेच प्रसंग येतील आणि आपल्या गुरुला त्रास होईल म्हणून त्याने गुरुजवळ न राहण्याचा निश्चय केला व तसे त्यांना बोलून दाखविले.

## वांझ गाईला दूध

लोकांच्या मनातील भावना ओळखून ह्या मुलाला पुढेही ते त्रास देतील किंवा पुन: जीवे मारण्याचा घाट घालतील हे महाराजांनीही ओळखले. शिवाय डोक्यावर झालेल्या भयंकर जखमेमुळे मरणाची अशुभ सूचनाच त्यांना मिळाली. यामुळे आपल्या पश्चात या मुलाचे काय होणार हा प्रश्नही त्यांचेपुढे निर्माण झाला. त्याचे म्हणणे महाराजांनी ऐकून घेतले व मग ते त्याला म्हणाले–

'आज मी तुला माझे सर्वस्व देत आहे. तुझा व माझा काय अधिकार आहे हे या सर्व मूर्ख लोकांना दाखवून देतो. जा समोरच्या लमाण तांड्यातून त्या कपिला गाईचे दूध काढून घेऊन ये.'

हे ऐकताच तो मुलगा धावतच तांड्यात गेला व त्याने कपिला गाईचे दूध काढण्याचा विचार लमाण्यास सांगितला. त्यावर लमाणी म्हणाला, 'ही गाय तर वांझ आहे. बैलाप्रमाणे आजपर्यंत मी हिचा सांभाळ केला.'

मग त्या हुल्ला नावाच्या लमाण्याने ती कपिला गाय महाराजांजवळ आणून उभी केली व दोन्ही हात जोडून तो म्हणाला, 'देसाई महाराज, हिच्यापासून कोठून दूध मिळणार? आज दहा वर्षापासून ही गाय वांझ आहे. आपली खात्री पटावी म्हणून तिला येथपर्यंत आणले.'

त्यावर महाराज म्हणाले, 'मूर्ख आहेस तू. हिच्या कासेला तू ओळखलं नाहीस. तिनं आत कास केलेली आहे. जा लवकर भांडे घेऊन ये. मीच तुला तिचे दूध काढून दाखवितो.'

टमरेल हातात घेऊन महाराज दूध काढायला निघाले. प्रथम त्यांनी गायीच्या पाठीवर प्रेमळपणे हात फिरवला व मग कासेत हात घालताच ती गाय पान्हवली. तेथील सर्व लोक व लमाणी हे पाहून आश्चर्यचकित झाले. तीन शेर दूध निघाले.'

## महाराजांचा अनुग्रह

महाराजांनी मुलाला हाताला धरून जवळ बसविले व म्हटले, 'मुला, आता पिऊन टाक. हे दूध पिताक्षणीच तुला ज्ञान प्राप्त होईल. हे तीन शेर दूध कर्म, भक्ती व ज्ञान आहे.'

हे ऐकून मुलाने दूध पिऊन टाकले. मुलाला हृदयाशी कवटाळून महाराज ले, 'तू पूर्वजन्मीचा कबीर पुन्हा जन्म घेऊन आला आहेस हे विसरू नकोस. जन्मी संतांच्या सेवेसाठी तू आपली पत्नी वाण्यास दिली होतीस. म्हणून चारी राहा. त्यावेळी तू खूप भजन केलेस. पण आता मौन बाळग. एकाच वास्तव्य कर. शरणागतांस उद्धरून टाक.'


याप्रमाणे त्यांनी मुलास उपदेश केला. डोक्यावर जखमेस बांधलेले रक्तलांच्छित सोडून त्या मुलाच्या डोक्यास फकीर बांधतात त्या पद्धतीने बांधले. सर्व मिळून सेलूस आले.

दगडाच्या घावामुळे महाराजांचा शेवटी देहान्त झाला. त्यांच्या मृत्यूची निश्चित आढळून येत नाही. परंतु दासगणूंनी लिहिलेल्या त्यांच्या चरित्रात मार्गशीर्ष यात एकादशीच्या दिवशी बाबासाहेबांचे प्राणोत्क्रमण झाले असा उल्लेख ला. यावेळी साईबाबांचे वय २० असावे.

सेलूत गोपाळरावांची समाधी बांधण्यात येऊन तीत व्यंकटेशाच्या मूर्तीची करण्यात आली. त्यांच्या समाधीच्या जागी एक पिंपळ निघाला. नित्यनियमाने शुक्रवारी बरेच भाविक लोक समाधीच्या दर्शनास येतात. सेलू येथे सध्या जांची सातवी पिढी रहात आहे. प्रतिवर्षी येथे फार मोठी जत्रा भरते.

महाराजांच्या मृत्यूच्या घटनेचा त्या मुलावर फार जबरदस्त आघात झाला. मुलगा पुढे शिर्डीस साईबाबा या नावाने महान संत होऊन गेला.

आपण आपल्या गुरुच्या मृत्यूस कारण ठरलो या जाणीवेनं त्याच्या मनात ले. त्यामुळे पुढेही इतरांजवळ त्यानं आपल्या गुरुचा उल्लेख करणं प्रकर्षानं टाळलं. उल्लेख आलाच तर गुरुचे नाव न सांगता व्यंकूजी शहा, त्याचा धर्म, पंथ बाबींचा उल्लेख करी. त्यांची वृत्ती पुढे विरक्त व विक्षिप्त का बनली त्याचे या शोकमय पार्श्वभूमीत सापडते.



# श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशप<br>शिरडीकर यांचे अल्प चरित्र

(श्री साईलीला, शके १९६२ कार्तिक अंकावरुन)
(मागील अंकावरुन पुढे चालू)

'अवजानंति मां मूढा:। मानुषीं तनुमाश्रितम्॥
परं भाव मजार्नत:। मम भूत महेश्वरम्॥ श्री. भ. गी. अ. श्लो.

## माधवरावांचा पश्चाताप

देव आपल्या सारखाच एक माणूस आहे असे समजून आपण देवास ओळ नाही. व त्यामुळे आपण देवाशी अती सलगी केली. त्याची थट्टा मस्करी के त्याशी विनोद केला. देवाला अरे तुरे केले. मी तूं केले. त्याच्यावर रागावलों, रु त्याच्या जवळ चांगले चांगले मागितले. त्याच्याशी जोरा जोराने भांडलो. त्य नाना प्रकारची दुर्भाषणे बोललो. त्याला शहाणपण शिकवूं लागलो. तुझे आम्ही लागतो असे ही देवाला म्हटले. त्याच्याजवळ अशक्य कोटीतले नाना प्रकारचे केले. त्याला शपथा घातल्या व त्याच्याकडूनही घेवविल्या. त्याचेवर नानाप्रक आळ घातले. तू खोटा, खटयाळ, दुष्ट, चोर, भिकारडा, फकिरडा, थापाडया अ असे म्हटले, याबद्दल माधवरावांना कधी कधी आठवण होऊन अत्यंत वाईट व पश्चाताप होई. त्यांना रडू कोसळे व त्यांच्या नेत्रांतून सारख्या अश्रूधारा वा व त्यांनी ते कितीही आवरण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना पुन: पुन: दु:खाचे उ येत. कंठ सद्गदीत होई व अंत:करण भरून येई. माझ्या देवासारखा सर्वव्या सर्वशक्तिमान, महापराक्रमी व सर्व जाणणारा असा चालतां बोलतां हंसता खेळ देव या जगांत पुन: कधी दिसणार नाही. कोडकौतुक व लाड पुरवावे तर माझ्य देवाने पुरवावे. देवा, मी तुला न ओळखतां जे अनंत अपराध केले ते या त्रिभुवनाच्य पोटांत सामावणार नाहीत. पण झाल्या गोष्टीस आता काय इलाज! असे म्हणू कित्येक वेळा दु:खी होत.त्यांना हरघडी देवाच्या लडिवाळपणाची आठवण येई देवा, तूंच या माझ्या अपराधाची क्षमा कर असे म्हणत.

भक्तराज अर्जुनाला सुद्धां (विश्वरूपदर्शना पूर्वी) परमात्म्याला देव म्हणू

त्यांत्याच्याशी अशीच आपण सलगी केली व त्याला आपण दुर्भाषणे बोललो त्याजवळ भलभलते हट्ट घेतले व त्याचे अनंत अपराध केले म्हणून असाच झाला. तो श्री ज्ञानेश्वर माउलींनी खालील प्रमाणे वर्णिला आहे.

## अर्जुनाचा पश्चाताप

किंबहुना केवळ। सर्व तूंचि निखिळ।।
जैशी रार्णवी कल्लोळ। पयाचे जैसे।।५२५।।
म्हणोनिया देवा। तूं वेगळा नससी सर्वा।।
हे आले मज सम्दावा। आता तू चि सर्व।।५३६।।
परी ऐसिया तू ते स्वामी। काही च नेणाजी आम्ही।।
म्हणोनि सोयरे संबंध धर्मी। राहटलो तुजसी।।५३७।।
चिंतामणीची खाणी लागली। परी नोळखेचि म्हणून आव्हेरीली।।
तैसा तुझी जवळीक धाडिली। सांगातीपणें।।५४०।।
तू योगियांचे समाधि सुख। कैसा जाणेचि ना, मी, मूर्ख।।
अपराध जी सन्मुख। तुजसी करूं।।५४३।।
देवेसी कोलकाठी धरूं। आखाडां लोंबी झोंबी करूं।।
सारी खेळता तस्कारू। निकरें ही भांडो।।५४८।।
पाया लागोनि बुझावणी। तुझ्या ठायी शार्ङ्गपाणी।।
पाहिजे ऐसी करणी।। बहु केली आम्ही।।५४६।।
चांग ते उराउरी मार्गो। सर्व ज्ञासी बुद्धी सांगो।।
तेवीचि म्हणों काय लागों। तुझें आम्ही।।५४९।।
देव बोयनाच्या अवसरी। लोभें कीर आठवण करी।।
परी माझा निसुग गर्व अवधारी। जे फुगुनी चि बैसे।।५५१।।
कृष्ण म्हणोनि हांकारिजे। यादवपणे तूं तें लेखिजे।।
आपली आण घालिजे। जातां तुज।।५५३।।
म्हणोनि काय काय आतां। निवेदिजेल अनंता।।
मी राशी आहे समस्तां। अपराधांची।।५५५।।
म्हणोनि त्रिभुवनीं तूं एक। तुजसारखा नाही आणिक।।
तुझा महिमा अलौकिक। नेणिजे वानूं।।५६६।।
तरी देवेसी सलगी केली। जे विश्वरूपाची आळी घेतली।।
ते मायबापें पुरविली। स्नेहाळाचेनी।।५७९।।
सुरतरूंची झाडें। आंगणी लावावी कोडें।।

देयावं कामधेनूचे पाडे। खेळावया॥५८०॥
मियां नक्षत्रीं डाव पाडावा। चंद्र चंडुवालागी आणावा॥
हा छंद सिद्धि नेला अघबा। भाउलीये तुवां॥५८१॥

माधवरावांचा पश्चाताप वरील भक्तराजाचे पश्चातापा प्रमाणेंच नव्हे का

## माधवरावांवर बाबांचा अनुग्रह

श्री रामदासी बुवांच्या पोथ्यांतून बाबांनी त्यांस न कळत विष्णु सहस्त्रना पोथी काढून घेऊन ती माधवरावांस देऊन 'श्याम्या, ही रोज वाचीत जा ब रे' अशी माधवरावांस आज्ञा केली. 'देवा, माझ्या वाणीला संस्कृताचा गंध मला ही इष्णु सहस्त्र नामाची संस्कृत पोथी कशी रे वाचतां येईल?' बाबा म्हण 'येईल वाचतां श्याम्या, जा वाचायला लाग'. माधवरावांनी नंतर फार मेहनत क बाबांचे आज्ञेवर भरवसा ठेवून, चांगल्या संस्कृतज्ञ भक्तमंडळी कडून त्या पो उत्तम संथा घेतली. व शुद्ध व स्पष्ट उच्चारयुक्त विष्णुसहस्त्रनाम मुखोद्गत केले बाबांचे आज्ञेप्रमाणे त्यांचे देहावसान होईपर्यंत नित्य नेमाने ते दररोज न वि विष्णुसहस्त्रनाम म्हणत. हाच बाबांचा माधवरावांवर अनुग्रह.

## माधवरावांचा स्वभाव

माधवराव स्वभावाचे तापट पण मनमिळाऊ, मायाळू, प्रेमी, परोपक सच्छील व वेदांती, निर्मळ स्वभावाचे व मुत्सद्दी. त्यांचे ठिकाणी पुष्कळ स सन्निपाताबरोबर काही दोषही असतील. पण जगांत एका परमात्म्यावांचून निर्दो समदृष्ट असे कोणीच नाही.

## त्यांचे गुणदोष

''निर्दोषंहि समंब्रह्म'' (श्री. भ. गी., अ. ५, श्लो. १९) तथापि 'एक दोषोगुणसन्निपाते निमज्जतींदोः किरणे ष्विवांकः !' या कविश्रेष्ठ कालिदासोक्ति न्या माधवरावांचे तेज व छाप बाबांचे सर्व भक्तांवर व इतरहि बहुजन समाजावर जी त्यांचे मुख्य कारण बाबांची विशिष्ट कृपा हें तर आहेच, पण शिवाय त्यांच्या ठिका वसत असलेला अनेक गुणांचा सन्निपात हेहि आहे. चन्द्र किरणांनी झांकले चंद्रकलंकाप्रमाणे त्यांचेहि दोष त्यांच्या अनेक गुणसमुदायांनी झांकून गेले होते. हंस न्यायानें माधवरावांच्या सद्गुणांतून जे काय शिकण्यासारखे असेल त्याचे ग्रहण क व त्यांचे दोष असतील त्याकडे दुर्लक्ष करून त्यांचा त्याग करणे हेंच प्रत्येक बाबाभक्त श्रेयस्कर आहे असे मला वाटतें. माधवराव हे बाबांच्या अनुभवाचें एक अमोल अमर्याद भांडारच होते.

## त्यांची पूज्यता

कै. राधाकृष्ण आई, नानासाहेब चांदोरकर, काकासाहेब दिक्षित, तात्यासाहेब नूलकर, आण्णासाहेब दाभोलकर, म्हाळसापती, बापूसाहेब बुटी, बाळासाहेब भाटे, अण्णा चिंचणकर, प्रभृति भक्त शार्दुलाप्रमाणे माधवरावहि मला पूज्य व वंदनीय आहेत.

## उदी दृष्टांत

माधवरावांनी बाबांचे हातची पवित्र उदी जवळ जवळ मातीचे दोन मोठमोठे डेरे भरून काळजीपूर्वक पुण्य भावनेने घरांतील खालचे खोलीचे कोपऱ्यांत संग्रही ठेविली होती. बाबा समाधिस्थ झाल्यावर त्याच डेऱ्यांतील उदी ते प्रसंगविशेषी सर्वांना देत. ह्या डेऱ्यांत बाबांचे हातची दिव्य उदी ठेविली आहे असें घरांतील स्त्री जनाना माहीत नव्हते. एके दिवशी घरांतील फार दिवसाची साचलेली घाण बाहेर फेकून देण्याच्या इराद्याने राखेची घाण म्हणून ते दोन डेरे बाया माणसांनी निराळे काढून ठेवले. ही गोष्ट माधवरावांचे गैर हजेरीत झाली. माधवराव त्या वेळी मुंबईस गेले होते. 'श्याम्या, तुझ्या घरांत तूं जपून ठेवलेली माझे हातची उदी उकिरड्यावर चालली रे. जा लवकर येथून व ती नीट ठेव', असा माधवरावांना मुंबईस एके रात्री दृष्टांत झाला. माधवराव खडबडून जागे झाले व ही देवाची सूचना आहे; आजपर्यंत जपून ठेवलेले देवाच्या कृपेचे अमोल भांडवल उकिरड्यावर जाईल असे समजून ते तावडतोब शिरडीस परत आले व चौकशी अंती स्वप्नांतील गोष्ट खरी असे ठरले. नंतर त्यांनी ती उदी माडीवर आपल्या ताब्यांत ठेविली. ती अद्याप पावेतो त्यांचे राहते घरी आहे.

## माधवरावांना नेहमीची मदत

वरील चरित्रावरून बाबांचे लाडके भक्त या दृष्टीनें माधवरावांची योग्यता काही विलक्षणच होती असे दिसून येईल. व याच गोष्टींची जाणीव ठेवून कै. काकासाहेब दीक्षितांनी माधवरावांवरील अतुल प्रेमाची खूण म्हणून माधवरावांना शिरडी येथील आपले वाड्यांत काही खोल्यांत नेहमी राहण्याची परवानगी देऊन वाड्याच्या साफसुफीची व देखरेखीची कामगिरी त्यांचेवर सोपविली होती. व स्वत:चे राहते घर भाड्यानें देऊन माधवरावांना त्यांचे जे दरमहा भाडें मिळे तीच त्यांना अप्रत्यक्ष स्वल्प मदत म्हणून करून दिली. माधवराव काकासाहेबांच्या निधनानंतर त्यांचे वाड्यांतील जागेची शि. संस्थानास दरसाल भाडेचिठी बिनबोभाट करून देत.

तसेंच कै. श्रीमंत बापूसाहेब बुटींनीहि बाबांचे प्रिय भक्त या नात्यानें माधवरावांकडे, श्रीमंतांनी बांधलेल्या शिरडी येथील बाबांचे समाधि मंदिराच्या वरील सर्व भागाची साफसफाई व देखरेख करण्याची कामगिरी सोपविली होती. या

कामगिरीबद्दल मदत म्हणून बापूसाहेब माधवरावांना सात रु. दरमहा देत. बापूसाहेबांचे निधनानंतर त्यांचे व्रत त्यांच्या औदार्यशील चिरंजीवांनी माधवरावांच्या निधनापर्यंत तर चालविलेंच. पुढें काय होणें असेल ते बाबांना माहीत.

माधवरावांनी आपला देह, काकासाहेब दीक्षित, भाऊ साहेब धुमाळ, आण्णा साहेब दाभोलकर या पुण्य भक्तां प्रमाणे कोणत्याही प्रकारचे कष्ट न सोसावे लागतां फक्त एक अहोरात्र व दुसरे दिवशी रात्री १२ वाजेपर्यंत बेशुद्ध स्थितीत राहून आपले स्वत:चे वास्तूत शके १८६२ चैत्र कृ. ४ गुरुवार दिनांक २६ एप्रिल सन १९४० या पुण्य दिवशी रात्री श्री साईसद्गुरु माउलीचे दिव्यचरणी ठेविला. त्यावेळी त्यांचे वय ८० वर्षांचे होते. अशा तऱ्हेचा मृत्यू क्वचितच कोणास लाभत असेल. पूर्व सुकृतावाचून व पूर्ण गुरुकृपेवाचून असा मृत्यू लाभणे कठीण. माधवरावांची निधन यात्रा दुसरे दिवशी सकाळी मोठ्या थाटाने निघाली. यात्रेस पुष्कळ गर्दी झाली होती. त्यांना पुष्कळ मंडळींनी सार्वजनिक मोठ्या विहिरीवर आदराने व प्रेमाने तिलांजली दिली. व नंतर मंडळी आपापल्या घरी गेली.

## श्याम माधवरावांना वंदन

### स्त्रग्धरा

प्रख्याता पार्थभक्ती, हरिचरणिं जशी, आठवी सख्य साची॥
तैसीची सख्य भक्ती, शिरडी सुरपदीं, श्यामया माधवाची॥
त्या शामा माधवांच्या, शुचि पदकमली, मस्तका सत्प्रभावें॥
ठेवूनी बाल वंदी, नत विमल मनें, आदरें प्रेमभावें॥

ठाणें गुरुवार भाद्रपद शु. ४
शके १८६२
दिनांक ५-९-४०

संतपद रजदासानुदास
**बालकृष्ण विश्वनाथ देव**

---

श्री साईलीलाच्या जून १९९० अंकात "श्री साईमंदिर परिसराचा अल्पावधीतच सर्वांगीण विकास" ह्या शीर्षकांतर्गत वृत्तांतात पृष्ठ क्रमांक १९ वर ६ व्या ओळीत ....नानासाहेब चांदोरकरांना.... असे नजरचुकीने प्रसिद्ध झाले आहे. तरी कृपया ते असे वाचावे ....काकासाहेब दिक्षितांना....

---

# श्री साईंचे सत्य चरित्र - अध्याय ७ वा

पूर्वार्ध

**सटीक गद्य अनुवाद :**
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त),
बंड गार्डन रोड, पुणे.

**''विविध कथा निरूपणं''**
(नाना प्रकारच्या गोष्टींचे वर्णन)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु ...राजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र ...ना नमस्कार असो. श्री सद्गुरू साईनाथांना नमस्कार असो.

आता पूर्वीच्या (सांगितलेल्या) कथेचे अनुसंधान (संगती) आठवण ठेवून मनात ...णू या. देवळाच्या जीर्णोद्धाराची (नवीन बांधणी किंवा डागडुजी करणे) बाबांना ...शी आवड होती? परोपकारासाठी कसे कष्ट करीत, कसे आपल्या भक्तांना ...भाळीत, कसे आपला देह झिजवीत आणि कशी भक्तांची दुःखेही सहन करीत? ...माधीसहित (इंद्रियांचे दमन करून आत्मस्वरूपात लीन होणे. योगातील आठवी ...शेवटली पायरी यासहित) खंडयोग (हटयोगातील साधनांपैकी शरीराचे तुकडे तुकडे ...रून पुन्हा जोडण्याचा एक प्रकार), धोती-पोती (हटयोगातील साधनांपैकी पोटाच्या ...आतडी शुद्ध करण्याचा प्रकार) इत्यादी प्रयोग करीत. कधी हात, पाय व डोके वेगळे ...रीत (कर+पद+शिर+वियोग) तर कधी ते पूर्वीप्रमाणे जोडून टाकीत (संयोग पूर्ववत्). ...हिंदू म्हणावे तर यवन (मुसलमान) दिसत आणि यवन म्हणावे तर चांगल्या गुणांनी ...क (सुलक्षण) हिंदू दिसत. असा हा असामान्य (विलक्षण) अवतार कोण विचक्षण ...विद्वान) वर्णन करील? बाबांची जात हिंदू की मुसलमान याचा किंचितूही ...अणुप्रमाण) पत्ता (थांग) लागला नाही. त्यांचे वागणे दोन्ही पक्षाला ...हिंदू-मुसलमानांना) सदासर्वदा एकसारखे (समसमान) होते. हिंदूंचा रामनवमीचा सण, ...भामंडपात पाळणा बांधवून आणि कथाकीर्तनासह स्वतः आपण करवीत. समोर ...कात पाळणा बांधला जाई व रामाचे कीर्तन करवून घेत आणि त्याच रात्री ...सलमानांना संदल (घासलेले चंदन व त्याचे लहान लहान तुकडे एका ताटात ठेवून ...ची वाजतगाजत गावातून मिरवणूक काढणे व नंतर मशिदीत येऊन तेथल्या ...नाड्यात आणि भिंतीवर हाताने छाटणे. ही प्रथा बाबांचा एक प्रतिष्ठित मुसलमान ...क अमीर शक्कर याने उरूसाच्या दिवशी सुरू केली होती. आणि ती आज सुद्धा

रामनवमीच्या उत्सवाच्या रात्रीं शिरडींत चालू आहे.) मिरवणुकीची परवानगी (अनुज्ञा) देत. जमतील तितके मुसलमान जमवून समारंभाने संदलची मिरवणूक काढवीत. अशा प्रकारे दोन्ही उत्सव आनंदाने एकसारखे (पक्षपात न करता) करवून घेत. रामनवमीचा दिवस आला म्हणजे (पेहेलवानांच्या) कुस्त्या लावण्याची आणि घोडे, तोडे (मनगटांव किंवा पायाच्या घोटयावर घालण्याचा दागिना), पगडया (डोक्यास बांधण्याचा पटका किंवा साफा) बक्षीस देण्याची भारी हौस. गोकुळअष्टमीचा सण आला म्हणजे गोपाळकाला (दहीहंडी फोडणे, फुगडया खेळणे, नाचणे इ. मजेचा समारंभ) करवून घेत. तशीच मुसलमानांची ईद येता नमाज पढण्याला बंदी नव्हती (अटक ना). एकदा मोहरमचा सण आला. काही मुसलमान मशिदीत आले व म्हणू लागले की एक ताबूत (ताजा) बनवून गावात मिरवणूक काढावी का? (बाबांनी) आज्ञा दिल्याबरोबर ताबूत तयार झाला व चार दिवस ठेवून दिला. पांचवे दिवशी (त्या लोकांनी) खाली काढला तरी बाबांच्या मनाला ना सुख ना दुःख. अविंध (मुसलमान) म्हणावे तर कान टोचलेले (विंधित) होते, हिंदू म्हणावे तर सुंतेचा (शिश्नाच्या, म्हणजे पुरुषाच्या जननेंद्रियाच्या त्वचेचा छेद करण्याचा मुसलमानांचा एक धार्मिक विधी) पुरावा (प्रमाण) होता. असा हिंदू ना यवन बाबांचा पावन (पवित्र) अवतार होता. त्यांना हिंदू म्हणावे तर त्यांचे सदा मशिदीत राहणे (निवास) असे व यवन म्हणावे तर मशिदीत रात्रंदिवस (अहर्निश) अग्नी (हुताश) पेटलेला असे. मशिदीत जात्याचे दळण, मशिदीत घंटा व शंख वाजविणे, मशिदीत अग्निसंतर्पण (अग्नीला अन्नाची आहुती देऊन तृप्त करणे), मग हे मुसलमान कसे? मशिदीत सदा भजन, मशिदीत अन्नसंतर्पण (लोकांना अन्न खाऊ घालून तृप्त करणे), मशिदीत (हिंदू भक्तांना) अर्घ्य देऊन (देवादिकांना सुवासिक पाणी अर्पण करतात तसे देऊन) आपल्या पायांचे पूजन करू देणे, मग हे मुसलमान कसे? म्लेंच्छ (परकीय किंवा यवन जातीच्या लोकांबद्दल सामान्यपणे योजावयाचा शब्द) जाती जरी म्हणावी तर उत्तमोत्तम ब्राह्मण (त्यांची) पूजा करीत असत. (एवढेच काय) अग्निहोत्री (सकाळ संध्याकाळ अग्नीला शास्त्रोक्त होम देऊन अग्नी सतत राखण्याचे व्रत पाळणारे अत्यंत श्रेष्ठ समजले जाणारे ब्राह्मण) सोवळ्याचा अभिमान (स्फीती) टाकून लोटांगण घालीत असत; असे आश्चर्यचकित झालेले लोक प्रत्यक्ष अनुभव (प्रचीती) घेण्यासाठी जे येत तेही आपण तसेच वागत (लोटांगण घालीत) आणि दर्शन झाल्यावर मूग गिळत (गप्प बसत) असत. अरे! जो सदा श्रीहरीला शरण आहे त्याला हिंदू किंवा यवन कशाला म्हणावे? तो शूद्र (हिंदूंच्या चातुर्वर्णातील चवथा व अगदी खालचा वर्ण) असो, अति शूद्र असो किंवा (कोणत्याही) जातीशिवायचा (जातिविहीन) असला तरी काय हरकत आहे? (त्याची योग्यता ठरविण्यासाठी) जाती हे अणुमात्रही (मुळीसुद्धा) माप (प्रमाण) नव्हे. ज्याला

देहाचा अभिमान नाही, ज्याला हिंदू असो वा मुसलमान असो सर्व सारखे, त्याला जातीचा भेदभाव (भिन्नपण) नसतो. तो फकिराच्या (मुसलमान धर्माचा भिक्षेकरी साधू) पंक्तीला बसला तर मांसाहार करील, अथवा प्रसंगानुरूप (यदृच्छा) मासे वगैरे खाईल (मत्स्य+सेवन) आणि तेथेच जरी कुत्र्याने (श्वान) तोंड घातले तरी त्याचे मन विटणार नाही (तिरस्कार वाटणार नाही.). (ओ. १-२२)

पुढच्या वर्षी दुष्काळ (तोटा) पडला तर पुरवठा व्हावा म्हणून शेतकरी (कृषिबल) मोटा (मोठे पोते) बांधून चालू वर्षाच्या धान्याचा साठा करत असतो. त्याप्रमाणे बाबांच्या (देखील) संग्रही (जमविलेले) गव्हाचे पोते होते. मशिदीत दळण्यासाठी जाते (धान्य दळण्याची चक्की) होते. पाखडायला (धान्य वगैरे सूपात घालून चांगले हालवून त्यातील भूसा वगैरे झटकून बाहेर उडवून लावण्याला) (बांबूचे) सूप होते. प्रपंच (संसार) चालवायला (जणूकाय) काही कमी नव्हते. सभामंडपात सुंदर खासे तुलसीवृंदावन होते व तेथेच एक लाकडी अति शुभ्र चिन्हयुक्त (सुलक्षण) कोरीव (कांतीव) रथ (स्यंदन) होता. (हा इंदूरचे प्रेमळ भक्त बाळासाहेब रेगे, दाजीसाहेब अवस्थी वगैरेंनी उत्सवाचे दिवशी गावात मिरवणुकीसाठी संस्थानास अर्पण केला होता.) (ओ. २३-२४)

काही पुण्य गाठीशी होते म्हणूनच अशा चांगल्या वस्तूची (सद्वस्तूची) म्हणजे परमेश्वराची भेट झाली आहे. (म्हणून) तिला हृदयरूपी करंड्यात किंवा पेटीत (संपुटीत) अशी साठवून ठेवा की मरेपर्यंत तिची तूट भासू नये. काही पूर्व जन्मी कमावलेले (पूर्व+अर्जित) उत्तम भाग्य होते म्हणून हे (साईबाबांचे) पाय हाताशी आले आणि मनाला शांतता व संसारात काळजीपासून मुक्तता (निश्चिंतता) लाभली. पुढे कितीही सुखसंपन्न झालो तरी हे श्री साईसमर्थांच्या सहवासापासून मिळालेले सुख पुन्हा कधीही परत येणार नाही. मी ते सुख भोगून (खरोखरीच) धन्य झालो आहे. आत्मानंद व एकाग्रता यांनी परिपूर्ण (स्वानंद+एकचित्+घन) असा साई. त्याचे किती कौतुक (नवल) वर्णन करू! जो जो त्याचे पायी रमला (रतला) त्याला त्याने आपले जागीच (कायमचा) बसविला. (ओ. २५-२८)

(क्रमशः)

## ''प्रो. गणपतराव नारके, पुणे''

(दिनांक १०, २०, २५, २८ मे १९३६)

मूळ लेखक – कै. श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी, मद्रास.
मराठी अनुवाद – श्री. श. बा. पटवर्धन, मुंबई.

सत्पुरुषांचे अनुभव व स्वत:ची अध्यात्मातील प्रगती हे दोन्ही उघड करता येत नाहीत. ''जिन्ने पाया, उन्ने छुपाया'' या कबीर वचनोक्तीचे अक्षरश: पालन करावे, अशी माझ्या सद्गुरु साईनाथांची आज्ञा असे. माझे अनुभव सांगण्यासाठी तोंड उघडले तरी शब्द उमटत नाहीत. पण त्यावेळी घडलेल्या घटना व साईबाबांसंबंधी थोडी माहिती मी देऊ शकेन. त्या जाहीर असल्याने सांगण्यात गुप्ततेचा नियमभंग होत नाही. पण तुम्ही बाबांविषयी जी काय माहिती मिळेल ती जाणण्यास फार उत्सुक आहात म्हणून मी काही घटना सांगतो.

तुम्ही पाहतच आहात की बाबांचा फोटो मी देव्हाऱ्यात ठेवला आहे. बाबा सत्पुरुष नसून प्रत्यक्ष ईश्वरच आहेत. त्यांच्या डोळ्यांतील दैवी तेज पाहून ते सत्पुरुष असल्याची खात्री पटते. त्यांची शक्ती व त्यांच्या कृतीही अद्भुत होत्या. आता मी त्यांच्या सहवासात कसा आलो ते सांगतो. माझे श्वशुर श्री. गोपाळराव बुटी, माझी पत्नी आणि माझी आई हे सर्व बाबांना परमेश्वर मानून त्यांची पूजा करीत असत त्यावेळेस माझे ज्ञानेश्वरी वाचन चालू होते. मी त्यावेळी स्कॉलरशिप मिळवून कलकत्याला गेलो व तेथे भूस्तर शास्त्रातली एम्.ए. ही पदवी १९०५ साली मिळवली. १९०९ साली हिन्दुस्थान सरकारने मला मँचेस्टरला पाठविले. तेथे ३ वर्षे राहून मी भूस्तर शास्त्र व खनिज शास्त्र यात एम्.एस्सी पदवी मिळवून १९१२ च्या ऑगष्ट मध्ये परत आलो. परदेशात असतांना ज्या वेळेस माझे श्वशुर, पत्नी व मातोश्री शिरडीस असायचे, त्यावेळी शिरडीस येऊन बाबांचे दर्शन घेण्याविषयी ते आग्रहाने मला कळवित असत. जर बाबांना मी हवा असेन तर मी येईन असे मी त्यांना कळविले. म्हणून बाबांना विचारून माझ्या श्वशुरांनी लिहिले की, मी शिरडीस यावें अशी बाबांची इच्छा आहे. त्याप्रमाणें मी १९१३ सालच्या एप्रिलमध्यें शिरडीस गेलो. माझ्या आप्तांवर बाबांची कृपा होती. माझी आई तेथे गेली की त्यांना फार आनंद होत असे. पहिल्या भेटीत माधवराव देशपांडे माझेबरोबर होते. त्यांनी बाबांना माझी ओळख करून दिली.

बाबा म्हणाले, "तू याची माझ्याशी ओळख करून देतोस! अरे, गेल्या तीस पिढ्यांपासून मी याला ओळखत आहे". किती अगाध ज्ञान होते हे! या दर्शनात मला सर्वात जास्त जाणवले ते म्हणजे बाबांचे डोळे. त्यांची तेजस्वी भेदक नजर माझे अंतर्याम पार भेदून गेली. चावडीत बसलेल्या त्यांच्या मूर्तीचा कायम ठसा माझ्या मनावर उमटला. यानंतर मला एक एक अनुभव येऊ लागले. मी इतर भक्त-मंडळींप्रमाणे तिथे राहून शक्य ती सेवा करू लागलो. एके दिवशी आरतीच्यावेळी एकाएकी बाबांना अतिशय क्रोध येऊन शिव्या शापांचा अखंड वर्षाव सुरू झाला. तो पाहून यांचे डोके थ ठिकाणावर आहे ना? असा एक विचार मनास चाटून गेला. आरती झाल्यावर दुसरी मी त्यांचे पाय चेपीत बसलो. त्यांनी माझे डोके थोपटून म्हटले, "मी वेडा नाही रे". त्यांचेपासून कोणालाही विचार लपविता येणे शक्य नाही, अशी माझी खात्री झाली. मला वाटले, हाच माझा अंतरात्मा आहे आणि त्यांच्या अंतर्यामित्त्वाचे ओच दाखले पुढेही मला मिळाले. जेव्हा ते बोलत तेव्हा असे वाटे की, ते माझ्या हृदय सिंहासनावर बसून माझ्या सर्व इच्छा, आकांक्षा जाणून बोलत आहेत आणि माझी पूर्णपणे खात्री पटली की हाच अंतर्यामी ईश्वर आहे. हा सर्वज्ञानी, सर्वसाक्षी असून आपल्या इच्छेप्रमाणे घटना घडविणारा आहे. वर्तमान, भूत व भविष्य काळातील कोणतीही घटना त्यांना अज्ञात नव्हती. १९१३ साली त्यांनी मला सांगितले की माझे श्वशुर शिरडीत एक मोठा दगडी वाडा बांधतील व त्याची देखरेख माझेकडे राहील. न १९१५-१६ नंतर माझ्या सासऱ्यांनी वाडा बांधण्यास सुरुवात केली व १९१८-१९ नंतर मी एका समाधिस्थानाचा विश्वस्त झालो.

माझ्या नोकरीची आईला फार काळजी वाटत असे. त्यावेळेस मला नोकरी निमित्त निरनिराळ्या गांवी जावे लागत असे व मधून मधून बेकारी पत्करावी लागत असे. मी ज्या शाखेचा इंजिनियर होतो, त्यामुळे मला खनिज शोधाची कामे मिळत असत. पण ती फार दिवस चालत नसत. शिरडीच्या पहिल्या भेटीत मी तेथे ३/४ दिवस राहिलो व तेथून बालाघाट व नंतर ब्रह्मदेशाला गेलो. ते काम तीन महिने चालले. तेथे माधवराव देशपांड्यांचे पत्र आले की बाबांनी मला शिरडीस बोलाविले आहे. मी एकटाच शिरडीस गेलो व तेथे तेरा महिने राहिलो. तेव्हा मी बेकार होतो, पण ती काळजी मी केली नाही. ते फकिरी जीवनच मला बरे वाटले.

१९१४ सालात बाबांनी बऱ्याच कफन्या तयार करवून घेतल्या आणि बऱ्याच लोकांना दिल्या. थोड्या अंतरावरून मी हे पहात होतो. तेव्हा असे वाटले की, आपणलाही एखादी कफनी मिळावी. म्हणजे ती घालून बाबांचे भजन आपल्याला करता येईल. तेव्हा कफनी वाटप थांबवून बाबांनी मला बोलाविले व म्हणाले, "तुला

कफनी न दिल्याबद्दल मला दोष देऊ नको. तुला कफनी देण्याची फकिराची (देवाची) परवानगी नाही.'' असे म्हणून त्यांनी मला मुलाप्रमाणे थोपटले.

माझ्या जीवनातील अस्थिरतेमुळे माझ्या आईला नेहमी चिंता वाटत असे आणि माझ्या ब्रह्मदेश, बंगालच्या वाऱ्या पाहून माझी आई नेहमी बाबांना विनवीत असे की मला बाबांजवळ किंवा शिरडीजवळच नोकरी मिळावी. बाबा म्हणाले की ते मला पुण्यात ठेवणार आहेत. एकदा कलकत्त्यास जावे की ब्रह्मदेशास जावे असा प्रश्न पडला असता बाबा म्हणाले, ब्रह्मदेशास जावे. ते असे म्हणत की ब्रह्मदेशास जा व पुण्यास जा किंवा अमुक गांवी जा व पुण्यास जा. याप्रमाणे प्रत्येक गावानंतर पुण्याचा ते उल्लेख करीत. सन १९१६ साली बनारसची अध्यापकाची नोकरी व ब्रह्मदेशातील खनिज शोधाचे काम यापैकी एकाची निवड करण्याची वेळ आली तेव्हा बाबा म्हणाले, ब्रह्मदेशास जा व पुण्यास जा. हे ऐकले की मी मनोमन हसत असे. कारण मी खाणकामाचा इंजिनियर होतो व तसले काम पुण्यात मिळण्याची अजिबात शक्यता नव्हती. पण मला सद्याची पुण्यातील नोकरी १९१७ साली लागली. इंजिनियरिंग कॉलेजमध्ये भूविज्ञान शास्त्राचा अध्यापक अशी नोकरी पुण्यात मिळणार आहे, हे १९१३ सालापासून बाबांना माहीत होते.

१९१६ चे सुमारास मी बऱ्याच कालावधीनंतर शिरडीस गेलो. गेल्याबरोबर कोण कोण भक्त काय काय बाबांची सेवा करीत आहेत याची चौकशी केली. तेव्हा मला कळले की, वामनराव पटेल, बी.ए., एल्.एल्.बी., वकील, मुंबई हे बाबांच्या वतीने गावात भिक्षा मागत आहेत. हे ऐकल्यावर मला थोडा हेवा वाटला. असा विचार आला की, हे काम मला का मिळू नये? पण हा विचार मी कोणाजवळही व्यक्त केला नाही. इतक्यात दर्शनाची वेळ झाली. पायात बुट, अंगावर सुट व डोक्यावर हॅट अशा पोषाखातच मी मशिदीत गेलो. त्या वेळेस वामनरावांना भिक्षा मागण्याची परवानगी द्यावी अशी विनंती बाबांना करण्यात येत होती. एकदम बाबांनी माझ्याकडे बोट दाखविले व म्हणाले की, यांना आज भिक्षेची झोळी घेऊन जाऊ दे. मी सुटाबुटातच झोळी घेऊन भिक्षा मागितली. यानंतर पुढील ४ महिने मी बाबांकरिता भिक्षा मागीत असे. या कामाकरिता बाबांनी मलाच का निवडले हे कोणालाच उमगले नाही. माझा अंतर्यामीचा परमेश्वर असलेल्या बाबांनी माझी इच्छा जाणून तशी सेवा करण्याची संधी दिली. आणि हे भिक्षा मागण्याचे भाग्य फारच थोड्यांच्या भाग्यात होते.

१९१७ साली पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजची जाहिरात आली तेव्हा या जागेकरिता अर्ज करावा का असे बाबांना विचारले. त्यांची संमती मिळाल्यावर मी

पुण्यास जाऊन संबंधित लोकांना भेटलो. नोकरी मिळण्याचे काम फारच अवघड होते. कारण त्या जागेकरिता बरेच वशिलेवाले इच्छुक होते. मी शिरडी सोडल्यावर बाबांनी जवळच्या लोकांकडे चौकशी केली, ''नारके कोठे गेला ?'' लोकांनी सांगितले की ते पुण्यास नोकरीकरिता गेले आहेत. त्यावर अल्ला भले करेल असे बाबा म्हणाले. त्यानंतर त्यांनी पुन्हां संतति आहे का असें विचारलें. मला मुलें झाली पण सर्व अकालीच निधन पावली असे लोकांनी सांगितलें. तेव्हां पुन्हा ते अल्ला भले करेल असें म्हणाले. १९१७ मध्ये मला नोकरी मिळाली व १९१९ मध्ये मी कायम झालो. त्यानंतरची संतती अजून हयात आहे. हे सर्व बाबांच्या कृपेनेच झाले.

अशातऱ्हेचे अनुभव बऱ्याचजणांना आले असतील. पण बाबांच्या बाह्य रूपावरूनच त्यांचे सामर्थ्य अजमावयास कोणी प्रयत्न करील तर ती मोठी चूक होईल. प्रत्येकाच्या मगदूराप्रमाणे बाबांचे सहाय्य त्यास मिळत असे. आपल्या व्यावहारिक अडचणींचा परिहार व्हावा एवढीच बहुतेकांची अपेक्षा असते. पण अशा लोकांना बाबांच्या आंतरिक सामर्थ्याची कधीच कल्पना आली नाही. आणि बाबांनी ती येऊ दिली नाही. पण एखादा निस्सीम श्रद्धेने त्यांचेकडे गेला तर आपले आंतरिक वैभव व सामर्थ्य ते उघड करीत असत. मी पहिल्या भेटीपासूनच बारकाईने सर्व गोष्टींवर नजर ठेवीत असल्याचे त्यांना माहीत होते. म्हणूनच ते मी हुशार आहे असे म्हणत असत. पण कधी कधी मी ठोंब्या आहे असेही म्हणत. कारण मी काही वेळा गोष्टीच्या तळापर्यंत जाऊन शहानिशा करून घेत नसे. याप्रमाणे बाबांनी चौकस बुद्धिला कधीच दडपून टाकले नाही. त्यांचा प्रत्येक शब्द व कृती अर्थपूर्णच असे. बऱ्याच वेळा ते मला उमगत नसे. सूक्ष्म दृष्टीने पाहणाऱ्याच्या हे लक्षात येत असे की बाबा या भूतलापेक्षा वरच्या सृष्टीत अदृश्य रूपाने वास करून तेथील घटना पण घडवीत असत.

ह्या बाबांच्या सामर्थ्याची ज्यांना कल्पनाही नव्हती त्यांना बाबांचे उद्गार अर्थहीन वाटत असत. शिवाय बाबांची भाषा पण गूढ, क्रोधी व व्याजोक्तीने भरलेली असे. त्या भाषेचा शब्दशः अर्थ घेणाऱ्यांना असे वाटे की बाबा भौतिकवादी, व्यवहारी असून लोभी पण आहेत. उदा. एक माणूस बाबांकडे येऊन ते काय बोलतात, काय करतात याकडे लक्ष ठेऊन बसला तेव्हा तेथे काय झाले असे मी त्याला विचारले. तो म्हणाला, ''सतत पैक्या संबंधीच बोलणारा असा दुसरा संत मी पाहिला नाही. माझी फार निराशा झाली.'' पण त्याला हे माहीत नव्हते की बाबा बहुतेक वेळा पैका हा शब्द पुण्य किंवा संपूर्ण या अर्थाने वापरीत. बाबांच्या शब्दाचे व कृतीचे सूक्ष्म निरीक्षण करणाऱ्याच्या हे लक्षांत येत असे की बाबांच्या प्रचंड सामर्थ्याप्रमाणेच त्यांचे भक्तिद्वाराचे मार्गही वैशिष्टपूर्ण होते.

सन १९१४ च्या सुमारास हर्द्याचा एक वृद्ध श्रीमंत गृहस्थ बरोबर बाई माणूस घेऊन शिरडीस आला. त्याला क्षय रोग झाला होता. एका महिन्यात त्याच्या प्रकृतीत बरीच सुधारणा झाल्याने त्याने मुक्काम वाढविला. पण एका महिन्यानंतर त्याची प्रकृती ढासळली व तो थोड्याच दिवसांचा सोबती आहे हे सर्वांना कळून चुकले. एके दिवशी त्याचे घरातील स्त्रिया व इतर मित्रांनी मला सांगितले की, त्याची स्थिती गंभीर आहे. पण बाबांकडे जाऊन त्यांचेकडून उदी घेऊन येण्यास कोणी वडीलधारे माणूस नाही म्हणून मी बाबांकडून उदी घेऊन यावे अशी त्यांनी विनंती केली. मी बाबांकडे जाऊन विनंती केली. बाबा म्हणाले, "अरे, देह ठेवण्यातच त्या माणसाचे कल्याण आहे, उदी काय करू शकणार?" मी उदी नेऊन दिली, पण बाबांनी काढलेले उद्गार त्यांना सांगितले नाही. त्याची प्रकृती अधिकच बिघडली म्हणून माधवराव देशपांडे यांनी बाबांकडे जाऊन अंतसमय निकट आल्याचे सांगितले. त्यावर, "तो मरेल कसा? जा, उद्या सकाळी तो जिवंत होईल", अशा तऱ्हेचे उद्गार बाबांनी काढले. याचा अर्थ तो गृहस्थ वाचेल असा सर्वांनी घेतला व त्याचेभोवती दिवे ठेऊन दुसरे दिवशी दुपारपर्यंत ते दगडावरच बसून राहिले, पण काही उपयोग झाला नाही. नंतर देहाची उत्तरक्रिया झाली. त्या गृहस्थाच्या आप्तांना मात्र असे वाटले की बाबांनी खोटी आशा दाखविली व ते खिन्न मनाने हर्द्यास परत गेले. नंतर ३ वर्षे त्यांचेपैकी कोणीही शिरडीस फिरकले नाही. नंतर एके दिवशी त्यांचेपैकी एकाला एक स्वप्न पडले. स्वप्नात बाबा आले, पण त्यांच्या मस्तकावर त्या मृत माणसाचे मस्तक होते. नंतर बाबांनी रोगांनी पोखरलेली त्यांची फुप्फुसे दाखविली व म्हणाले, "अशा भयंकर यातनांतून मी त्याला वाचविले आहे". यानंतर मात्र ते सर्व पुन्हा शिरडीस येऊ लागले. बाबांच्या पहिल्या उद्गारांचा अर्थ एवढाच की तो माणूस पुन्हा जन्म घेईल.

बाबांच्या बोलण्यात बऱ्याच वेळा त्यांनी अदृश्य रूपात केलेल्या दीर्घ प्रवासाचे उल्लेख येत असत. भक्त मंडळींबरोबर प्रातःकाळी धुनीजवळ बसले असताना आदल्या रात्री ते प्रवासाला गेले होते व तेथे त्यांनी काय केले हे सांगत असत. पण मशिदीत त्यांचेबरोबर निद्रा करीत असलेल्यांनी हे बघितलेले असे की बाबांचा देह रात्रभर मशिदीतच असे. पण बाबांनी उच्चारलेले शब्द पूर्णपणे सत्य होते व पुष्कळदा त्याचे प्रत्यंतर मिळत असे. तसेच मरणोत्तर अनुभवाबद्दल पण ते कधी कधी बोलत असत. शिरडीतील एका मारवाड्याचा मुलगा आजारी पडून वारला. उत्तरक्रिया आटोपून सर्व मंडळी मशिदीत उदास होऊन बसली होती. बाबा म्हणाले, "तो नदी जवळ गेला असून आता ती तो ओलांडीतच असेल." हा उल्लेख यमलोकात विवरणाचाच असेल असे मला वाटते.

पुष्कळ भक्तांना त्यांनी त्यांच्या त्यांच्या गतजन्मातील काही घटना सांगितल्या. पूर्वीच्या चार जन्मांतील घटना त्यांनी मला सांगितल्या. इतरांच्या देखत ते ते, पण कोणालाच ते माझ्याविषयी होते हे कळले नाही. बाबांची एक अपूर्व अशी होती की भक्त समुदायात बसलेल्या एकास काही सांगायचे असेल तर रीतीने निवेदन करीत की ते त्याचे त्यालाच कळे. त्यावेळच्या त्यांच्या कृतीने द्वारे कार्यभाग साधत असे. अदृश्य रूपात होत असलेला त्यांचा विश्वसंचार, घटनांचे ज्ञान व त्यांचे नियंत्रण करण्याची शक्ती हे सर्व पहातां त्यांच्या निरंतर त्वाची खात्री पटत असे. "तू कोठे आहेस? मी कोठे आहे? हे जग कोठे ?" असे त्यांचे उद्‌गार मी ऐकले आहेत. कधी कधी ते शरीराला हात लावून असत, हे माझे घर आहे, पण मी तेथे नाही. माझ्या मशिदगुरुने मला दूर आहे. देहधारी असतानांही त्यांची सत्ता देहापुरतीच मर्यादित नव्हती. आणि आपण च असे म्हणू शकतो की बाबा जिवंत आहेत. तेव्हा जेथे होते तेथेच ते आताही हेत.

क्वचित ते भूलोकांप्रमाणे इतर लोकांतील कार्याचा उल्लेख करीत. परगांवी ल्या जीवात्म्यांच्या पुढील प्रवासावर त्यांचे नियंत्रण असे. बाबा कधीही असत्य ले नाहीत. किंवा त्यांनी कधीही वायफळ शुष्क चर्चा केली नाही. एखाद्या भक्ताला च्या कार्याचा किंवा कृतीचा अर्थ कळावा अशी त्यांची इच्छा असली तरच त्या ला त्यांचे आकलन होत असे. मला बाबांनी कोणताही मंत्र, तंत्र किंवा उपदेश ला नाही. आणि माझ्या माहितीप्रमाणे कोणालाच दिला नाही. संगमनेरची राधाबाई मुखीण बाबांकडून उपदेश मिळावा या हट्टाने उपवासास बसली. चौथ्या दिवशी श्यामांना त्या वृद्धेची दया आली व त्यांनी तिला अनुग्रह देणेबद्दल बाबांची प्रार्थना ली. बाबांनी तिला बोलावून घेतले व म्हणाले, "मी कानाला डसणारा गुरु नव्हे. चे घराणे निराळे आहे. माझ्या गुरुने मला कानमंत्र दिला नाही तर मी तुला कसा देऊ? तू अनन्यदृष्टीने माझेकडे पहा, मीही तुझ्याकडे तसाच पाहीन." मग समाधान होऊन तिने उपोषण सोडले.

बाबांनी रूढ अर्थाने कोणतेही प्रवचन कधीच केले नाही. त्यांचे शब्दच फार पूर्ण असत. त्यामुळे त्यांच्या एखाद्या वाक्यावरच मुमुक्षू भाव आपली तात्त्विक दृढ करीत असे. त्यांचे बोल कोणत्याही एका ठराविक चौकटीच्या बंधनात नसत. मोक्ष हेच आपले ध्येय असले पाहिजे. त्यासाठी विवेक व वैराग्याची आपण धरली पाहिजे. अशातऱ्हेचे बोल मी त्यांच्या तोंडून कधींच ऐकले नाहींत. प्रत पोचणें हें ध्येय असले पाहिजे, असे ते म्हणत. अल्ला मिळेल, सात समुद्र

त्याहाल करेल, बेडा पार करेल, असे ते वेळप्रसंगी म्हणत. माझे माहितीप्रमाणे हे सर्व माया आहे, हे जग मिथ्या आहे, अशातऱ्हेचे उद्‌गार त्यांनी कधी काढले नाहीत. इहलोक व परलोक दोन्ही सत्य असून आपल्या कृतीने इह-परलोकी कल्याण करून घेतले पाहिजे, असे ते म्हणत. कर्म व पूनर्जन्म यांचा वारंवार उल्लेख त्यांच्या बोलण्यात येत असे. सत्कर्म पेरले म्हणजे चांगली फळे मिळतात, ह्या सिद्धांताला अनुसरून ते बऱ्याच गोष्टी सांगत. पुष्कळांच्या पूनर्जन्मीच्या व एखाद्याच्या पुढील जन्माच्या गोष्टी पण ते बोलत. मृत्यूनंतर जीवात्म्यांचे अस्तित्त्व, कर्मानुसार येणारे बरे-वाईट अनुभव यांविषयी बाबांचे सहवासात असणाऱ्या भक्तांना कधीच संदेह नसे. हिन्दू धर्माची हीच तत्त्वे आहेत. बाबांनी मी अमुक धर्माचा , जातीचा, पंथाचा असे कधीच सांगितले नाही. पण हिन्दू धर्माशी त्यांचा निकट संबंध वेळप्रसंगी त्यांचे बोलण्यातून व कृतीतून व्यक्त होत असे. माझा गुरु ब्राह्मण आहे, हे बाबांच्या तोंडून मी ऐकले आहे. भगवद्‌गीता, भावार्थ रामायण, भागवत पंचदशी, योगवसिष्ठ, पुराणे वगैरे ग्रंथांबद्दल त्यांना फार आदर होता. ज्ञानदेवांची आरती सुरू झाली की ते लगेच डोळे मिटून त्यांना हात जोडून वंदन करीत असत. पंचदशी या ग्रंथाविषयी ते दादासाहेब खापडर्यांना म्हणाले, ''ये तो हमारा खजाना है'' आणि योगवसिष्ठाविषयी त्यांना किती आदर होता, याचा मला पडताळा आला. सन १९१४ चे सुमारास माझ्याकडे वरचेवर १५ रुपयांची ते दक्षिणा मागत. त्यावेळी मी निष्कांचन होतो हे त्यांना माहीत होते. म्हणून मी त्यांचेबरोबर एकटा असतांना विचारले, ''माझ्याजवळ एक पै नाही हे तुम्ही जाणता आणि मग माझ्याजवळ १५ रुपये दक्षिणा का मागता ?'' बाबा म्हणाले, ''मला माहीत आहे. पण तू सद्या योगवसिष्ठ वाचीत आहेस. त्यात सद्या जो भाग वाचीत आहेस, तो फार महत्त्वाचा आहे. त्यातून मला १५ रुपयांची दक्षिणा दे. याचा अर्थ मी असा केला की, दक्षिणा दे, म्हणजे ग्रंथातील उपदेश आत्मसात कर, असे बाबांना सूचवायचे होते. राम व कृष्ण या देवांविषयी त्यांना फार आदर असे, अशी माझी खात्री होती. त्यांना ज्ञानेश्वर व तुकाराम ह्या संतांविषयी पण पूज्य भावना होती. पातंजळ योगमार्गाने, म्हणजे आसन, प्राणायाम, ध्यान-धारणेने कुंडलिनी जागृत करून अष्टसिद्धी मिळविणे यास बाबा महत्त्व देत नसत, पण त्यांनी असेही म्हटलेलं मी ऐकले आहे की आसन, प्राणायामाच्या मार्गाने जाणाऱ्याला देखील पुढील प्रगतीकरिता माझ्याकडेच यावे लागते. समाजात राहून, स्वत: कष्ट करून समाजहित साधावे, असे त्यांचे आचरण असे. सामाजिक कर्तव्ये टाळून निव्वळ भिक्षा मागणे त्यांना पसंत नसे. उदरनिर्वाहापुरती ते भिक्षा मागत व याचना ही ऋणानुबंध फेडण्याकरिता असे. मी व वामनराव पटेलांनी भिक्षा मागितली, ती गुरुप्रित्यर्थ व गुरु सेवा मानून. तुम्ही दक्षिणा का मागता, असे त्यांना विचारले, तेव्हा ते म्हणाले,

"मी प्रत्येकाकडे दक्षिणा मागतो का! फकीर (ईश्वर) ज्यांचेकडे बोट दाखवितो, अशा लोकांकडेच मी दक्षिणा मागतो." ते ठराविक रक्कमच दक्षिणारूपाने मागत असत. जास्त दिली तर घेत नसत. त्यांनी मागितली आणि कोणी दिली नाही, असे कधी झाले नाही. कधी कधी अमुक व्यक्तीकडून मागून आण व मला दे, असे ते म्हणत. ते अशाकरिता की दक्षिणेच्या निमित्ताने त्या व्यक्तीशी झालेल्या संभाषणातून एखादा महत्त्वाचा धडा शिकविला जात असे. उपनिषदे व ब्रह्मसूत्र आणि निव्वळ ज्ञानमार्गाचा धडा बाबांनी कोणाला दिला नाही. त्यांचे वस्तूकालीन ज्ञानाने व ईश्वरी सामर्थ्याने कोणत्या जीवात्म्यास किती गतीने प्रगती पथावर न्यावे याची पूर्ण कल्पना त्यांना होती. म्हणून त्यांनी सर्वसंग परित्याग करून विरक्ती जीवन कसे जगावे याचा धडा सर्वांना दिला. त्यांचे जीवन म्हणजे पूर्ण वैराग्य व निष्काम यांचा सुंदर संगम होता. बहुतेक इतर संतांप्रमाणे भक्ती-मार्गावर त्यांचा जास्त भर होता. निस्सीम गुरुसेवा करून त्यांच्या आज्ञेचे पालन करणे, हाच तो भक्ती-मार्ग होय! ईश्वराला गुरुरूपात पाहून अनुभव घेणे हाच त्यांना अभिप्रेत असलेला भक्ती-मार्ग. त्यांना खऱ्याखुऱ्या ब्राह्मणाविषयी आदर असे. असे ब्राह्मण पुष्कळ पैका व पुण्य मिळवतात, असे ते म्हणत.

शिष्य आणि भक्त यात खूप फरक आहे. गुरु-शिष्यात एक अतुट नाते असते व शिष्याची संपूर्ण जबाबदारी गुरुवर असते. शिष्याच्या बऱ्या-वाईट कर्मांचा भार गुरुला घ्यावा लागतो. शिष्याने गुरुची अक्षरश: आज्ञा पाळली पाहिजे. बाबांचा कोणताही शिष्य नव्हता. बाबा म्हणत, "माझ्या गुरुच्या सान्निध्यात माझा थरकाप होत असे." माझा शिष्य म्हणवून घेण्याची कोणाची छाती आहे आणि कोण आपल्या परिपूर्ण सेवेने माझे समाधान करू शकेल असेच त्यांना सुचवायचे होते. पण बाबांचे भक्त अनेक होते व त्या सर्वांचे बाबा आपल्या कृतीने व अगाध सामर्थ्याने समाधान करीत असत. गुरुकडे जाणाऱ्या भक्ताने संपूर्ण शरणागतीच्या भावनेने जावे, तसेच त्याचे आचरण शुद्ध असले पाहिजे, ही बाबांची अपेक्षा असे. तसेच त्याने जप किंवा ध्यान केलेच पाहिजे. जप किंवा ध्यान करणे यात कर्त्याच्या मनात "मी अमुक करीत आहे" असा अभिमान उत्पन्न झाला की व्यत्यय सुरू होतो. भक्ताच्या अहंकाराचा समूळ नाश झाला तरच गुरुची खरी सेवा करता येते. गुरु शिकवित नाही. सूर्यकिरणाप्रमाणे ईश्वरीशक्तीचे स्रोत तो प्रसरित करतो. संपूर्णपणे शरण गेलेल्या साधकाला या स्रोतात पूर्ण बुडून जाऊन आत्मोन्नति साधतां येते. कारण अशावेळी त्या स्रोताच्या आड येणाऱ्या अहंकाराचे अडथळे दूर झालेले असतात. बाबांकडे येणाऱ्या चौकस व चिकित्सक भक्ताला बाबा सांगत, "माझेजवळ बस व स्वस्थ रहा. बाकीचे मी सर्व करीन". याकरिता अर्थातच बाबांवर अढळ श्रद्धा आवश्यक

असे. त्यांचे सान्निध्यात आल्यावर ही श्रद्धा उत्पन्न होऊन बळावत असे. बाबांचे वर्तमान, भूत, भविष्याचे ज्ञान, अखिल विश्वात संचार करण्याचे व काळाच्या बंधनापलीकडे झेप घेणारे त्यांचे सामर्थ्य यांचा अनुभव आला की आपोआप श्रद्धा बसून ती क्रमाक्रमाने दृढ होत असे. अंधविश्वास ठेवण्याची मुळीच जरूरी नसे. आपण कोठेही गेलो तरी बाबा आपल्याजवळ आहेत. त्यांची कृपादृष्टी आपल्यावर आहे व ते आपल्या सर्व ऐहिक व आध्यात्मिक कामना पूर्ण करतात याचा प्रत्यय आल्यावर त्या भक्ताची प्रगती निश्चित साधली जात असे. मी असे ठामपणे म्हणू शकतो की बाबा ही एक अशी ईश्वरी शक्ती आहे की जी या अखिल भूमंडळावरील भक्तांचे जीवन, एवढेच नव्हे तर अनेक अदृश्य पातळींवर भविष्यात त्यांना जगावे लागणारे जीवन या दोहोंचे नियंत्रण व मार्गदर्शन करीत आहे. म्हणून साधकाचे किंवा भक्ताचे काम एवढेच की त्याने स्वतःचे आचरण शुद्ध ठेऊन शरणागतीने व विश्वासाने गुरुकृपेस पात्र होण्याचा नेटाने प्रयत्न करावा व उत्तरोत्तर उन्नती साधावी. यासाठी शुष्क, तात्त्विक काथ्याकुट व शब्द जंजाळांची जरूरी नाही. कारण अपरोक्षनुभुति देणाऱ्या या गुरुचे हाती त्याचे भवितव्य सुरक्षित असते. बाबांनी वेळोवेळी भक्तांना सांगितलेले चार शब्द, आणि कृतीने घालून दिलेले धडे यांचा परिपाक म्हणजेच वर व्यक्त झालेले विचार. माझ्या मते, आपण कशाचा अनुभव घ्यावयाचा आहे, हे न जाणता विवेक व वैराग्याविषयी बावांजवळ बडबड करणे, हा बालीशपणा असून यात केवळ आत्मवंचना नसून इतरांची घोर फसवणूक आहे. या पुस्तकी पांडित्याचा जीवनात काहीच उपयोग नाही. जेव्हा बाबा म्हणत, ''प्रत्येक कुत्रा, मांजर, डुक्कर ही माझीच रूपे आहेत,'' तेव्हा त्या प्राण्यांच्या भावना व त्यांचे अनुभव व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांचेजवळ होते. पण इतर लोक हे बोलायचे म्हणून बोलतात. कारण हे गीतेत सांगितले आहे, म्हणून सत्य आहे असे त्यांना वाटते. पण याचा अनुभव घेणे त्यांचे कुवती बाहेर असल्याने अशी बडबड करणे हे एक ढोंगच आहे. खाली दिलेल्या प्रसंगावरून बाबांची थोरवी कळून येते. आमच्या दृष्टीने बाबा प्रत्यक्ष ईश्वर होते. हे खरे असले तरी देह धारण केल्यामुळे काही मर्यादा निश्चित पडल्या होत्या. ह्या आपापल्यापरीने दोन्ही बाजू सत्य होत्या, हे माझे मत शिरडीतील इतर भक्त मंडळींना आवडले नाही. एकदा बोलतांना द्वारकेत श्रीकृष्णाच्या वेळी ५६ कोटी यादव होते, असे एकाने विधान केले. त्यावर मी लगेच असा आक्षेप घेतला की सध्या हिन्दुस्थानची लोकसंख्या ३३ कोटी आहे. मग या विषयी बाबांचे मत ग्राह्य धरावे का, असे लोकांनी मला विचारले. मी होकार दिल्यावर सर्व बाबांकडे गेलो. सर्वांच्यावतीने माधवरावांनी बाबांना विचारले, ''बाबा, पुराणे खरी आहेत का?'' बाबा म्हणाले, ''होय खरी आहेत.''

भक्त :– राम व कृष्ण यांचेविषयी तुमचे काय मत आहे?

बाबा :– ते थोर आत्मे होते. प्रत्यक्ष देव होते. अवतार होते.

भक्त :– या नारक्यांना ते मान्य नाही. तुम्ही देव नाही, असे ते म्हणतात.

बाबा :– तो म्हणतो ते खरे आहे. पण मी तुमचा बाप आहे. आणि तुम्ही असे बोलू नये. तुम्हाला हवे असलेले सर्व तुम्ही माझ्याकडे मागून मिळविले पाहिजे.

याप्रमाणे भक्तांच्या भावनेप्रमाणे ते जरी प्रत्यक्ष ईश्वर असले तरी त्यांनी भौतिक देहामुळे पडलेल्या मर्यादा मान्य केल्या. बाबा ईश्वर आहेत, अशी भक्तांची भावना होती तरी बाबा त्या अधिकाराने कधीच वागले नाहीत किंवा या भावनेचा गैरवापरही त्यांनी कधी केला नाही. त्यांनी नैतिक किंवा देशाच्या प्रचलित कायद्याचे कधीच उल्लंघन केले नाही. त्यांच्या वागण्यात किंवा पोषाखात गबाळेपणा कधीच नसे व स्त्रियांबरोबर अलिप्तपणे वागत. क्वचित प्रसंगी मैं अल्ला हूँ असे म्हणत असले तरी नेहमी मी ईश्वराचा दास आहे, त्याच्या हुकूमाप्रमाणे मला करावे लागते, तो तुमचे भले करील, अशातऱ्हेचे त्यांचे बोलणे असे. बाबांच्या अति तेजस्वी डोळ्यांकडे पाहताच त्यांच्या अस्खलित ब्रह्मचर्याविषयी खात्री पटत असे. स्त्रियांना ते विशिष्ट अंतरावर ठेवत. फक्त काही स्त्रियांना गुडघ्यापर्यंत पाय चेपण्याची मुभा होती. त्यांचे वागणे नेहमी न्यायाला धरून व नि:पक्षपाती असे. केवळ श्रीमंत म्हणून किंवा थोर अधिकारीं आहेत म्हणून कोणाला त्यांनी जवळ केले नाही. कारण अशा लोकांचे अंतरंग त्यांना स्पष्ट दिसत असत. तसेच एखाद्या सामान्य गरीबाचा पण ते आदर करीत. याचे कारण त्या माणसाजवळ खूप पैका (पुण्य) जमा असे. एखाद्या संताभोवती जमा झालेल्या मंडळीवरून त्याचे मूल्यमापन केले जाऊ नये. वारांगणा, विषयासक्त आणि द्रव्य लोभी मंडळी त्यांच्याकडे आपला भौतिक फायदा करून घेण्यासाठी येत असत. पण त्यांच्या कृपेने स्वत:ची उन्नती करून घेण्यात ते लोक चुकले आणि पापाच्या गर्तेत पडले की बाबा त्यांना केलेल्या चुकांचे प्रायश्चित्त भोगावयास लावीत. त्यांचा न्याय फार कडक असे. गर्भात आडवे आले तर स्वत:चे मुल सुद्धा कापावें लागते, असे ते म्हणत असत. अंगभूत सामर्थ्यामुळे कोणत्याही गोष्टीला, प्रसंगाला धीटपणे सामोरे जात व त्याचा नायनाट ते करीत. उदा. मरी आईची साथ, काहींचे रोग निवारण आरोग्याचे नियम धाब्यावर बसवून ते करीत. या बाबतीत मला आलेला एक अनुभव सांगतो. १९१६ चे सुमारास शिरडीत प्लेगची साथ होती. बाबा एका हलवायाकडून नेहमी नैवेद्याकरिता मिठाई घेत असत. बाबांनी मला त्याच्या दुकानात जाऊन मिठाई आणावयास सांगितले. तेथे जाऊन पाहतो तो त्या हलवायाचे प्रेत दुकानात पडले असून शेजारीच त्याची बायको रडत बसली होती. तिला बाबांचा निरोप सांगितल्यावर प्रेताकडे बोट दाखवून मीच कपाटातून मिठाई काढून घ्यावी, असे तिने सूचविले. त्या भयंकर रोगाचा संसर्ग मला बाधेल या भयाने कापत कापत

मा ती मिठाई घेऊन आलो व त्याचाच प्रसाद वाटला गेला. बाबा म्हणाले, ''शिरडी सोडून गेल्याने तू जिवंत राहशील असे नाही. ज्याचा मृत्यू अटळ आहे तो मरणारच. जो वाचणार आहे तो वाचणारच''. कॉलऱ्याची साथ आली असतानाही त्यांनी मला असाच धीर दिला होता. काही महारोगी त्यांचे अंग चेपित असत. धुनीतून उदी घेऊन प्रसाद देण्याचे काम बाबा महारोग्याकडून करवून घेत. यामुळे कधीच कोणास त्रास झाला नाही. महारोग्याने दिलेली उदी प्रसाद म्हणून तोंडात घेणारे रुग्णसुद्धा त्या उदीने बरे झाले.

(क्रमशः)

## ''श्री साईलीला'' सभासदांना निवेदन

* **''श्री साईलीला'' संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना ''श्री साईलीला''च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या ''श्री साईलीला'' सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.**

* ''श्री साईलीला'' वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते, त्याप्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर आपली वर्गणी भरावी.

* पत्त्यात बदल झाल्यास शिरडी कार्यालयाला त्वरित कळवावे. पिनकोडसहित पूर्ण पत्ता लिहावा.

* आपल्या पत्त्यात काही दुरूस्ती सुचवायची असल्यास, पत्ता अपूर्ण लिहिला जात असल्यास त्या विषयी शिरडी कार्यालयाच्या निदर्शनास आणावे.

* ''श्री साईलीला'' मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या शिरडी व मुंबई कार्यालयाकडे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो ''श्री साईबाबा संस्थान शिरडी'' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. ''संदेश के लिए स्थान'' आणि ''भजनेवाले का नाम व पूरा पता'' असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व ्र्ण पत्ता लिहावा.

मनिऑर्डर-पत्रावर नाव-पत्ता लिहिताना तो वाचता येईल, अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.

आहार-विहार. . . ३

# वर्षा ऋतु

- वैद्य किरण पां. भावे, आयुर्वेदाचार्य,
मुंबई.

श्रावण व भाद्रपद या दोन महिन्यांत वर्षा ऋतु असतो. आधीच्या लेखामध्यें ...तल्याप्रमाणे वसंत व ग्रीष्म ह्यामध्यें आदानकाल म्हणजेच शरीर क्षीण झालेले ... भूक मंदावलेली असते. वर्षाऋतूमध्यें पाचन शक्ती आणखी मंद होते. कारण ... दोष दूषित झालेले असतात.

ग्रीष्मातील उष्णतेनंतर अचानक वर्षाऋतूमध्यें थंड हवा सुरू होते. त्यामुळे ... दूषित होतो. जमिनीतील गरम वाफा व दूषित पाणी यामुळे पित्त दूषित होते. ... गढूळ पाणी, दूषित अन्नपदार्थ, फळभाज्या इत्यादिंमुळे व भूक कमी असल्याने ... दूषित होतो. अशातऱ्हेने तीनही दोष दूषित होतात.

ह्यासाठी वर्षाऋतूमध्यें प्रकृतीस जपावे लागते. नाही तर सर्व रोगांना आमंत्रण ...सारखेच होते. उदा. सर्दी, खोकला, ताप, विषमज्वर, आव, जुलाब, कावीळ ...रखे रोग चटकन होतात.

ह्यासाठी वर्षाऋतूमध्यें सर्व दोषांना शमविणारा, भूक वाढविणारा आहार-विहार ...वा. सुरवातीस वमन, विरेचन घेऊन कोठा साफ करावा. नंतर बस्ति म्हणजेच ...कारी घ्यावी. वमन म्हणजेच उलटीचे औषध घेतल्याने कफ निघून जातो. विरेचन ...जेच जुलाब होण्याचे औषधाने उदा. हरडे इत्यादि सारख्या सौम्य विरेचक ...धांचा वापर करून पित्त कमी करावे. रात्री झोपण्यापूर्वी गरम दूधात चमचाभर ... घालून घ्यावे. किंवा मनुका चावून खाव्यात. याचबरोबर एरंडेल तेलाचा वापरही ...ण्यास हरकत नाही. वमनामध्ये गेळफळ किंवा मिठाचे पाणी याचा वापर करावा. ...क, अशक्त प्रकृतीच्या व्यक्तींनी वमनाचा प्रयोग सावधपणें करावा. बस्तिमध्यें ...ळाचे तेल आणि दशमूळाचा काढा याचा वापर करावा.

अशाप्रकारे आधीच दोषशमन करून रोग होऊ नयेत या दृष्टीने प्रयत्न करावा. ...ता आहार-विहाराबद्दल पाहू. आहारामध्यें सर्व दोषशामक व अग्निदीपक आहार

असावा. जुने धान्य वापरावे. पदार्थ स्निग्ध असावेत. जेवणातील पदार्थांमध्यें लसू सुंठ, हिंग, जिरे, ओवा, तूप या पदार्थांचे महत्त्व खूप आहे. या पदार्थांमुळे वाढते. तसेच अन्नपचन चांगले होते. त्यामुळे पोटाचे विकार होत नाहीत. यास जेवणात रोज लसूणचटणी करून खावी. भाज्यांचे सूप किंवा कढण इत्यादि पद सेवन करावेत. पाणी तापवून घ्यावे. सध्या बाजारात भारंग, टाकळा, यांसारखी भा मिळते. ती आणून जेवणात वापरावी. भारंग ही भाजी कफवात शामक असल्य तिचे सेवन अत्यंत हितकर ठरते. उदा. जुलाब, आव होत असतानां भारंग सारख भाजीने जुलाब थांबतात, आवही कमी होते. सूंठ अथवा लसूण देखील अशाच प्रका काम करतात. ताकामध्यें हिंग, जिरे, ओवा, तूप हे घालून गरम करून घ्यावे. किंवा चहामध्ये सूंठ, पिंपळी किंवा आले घालून चहा घ्यावा. मांसाहार घेणाऱ्या मांसरस घ्यावेत. परंतु मासे खाण्याचे टाळावे. तसेच ह्या दिवसांत पचण्यास जड डाळीचे पदार्थ, तळलेले, बटाटा, वांगे इ. सारखे वातूळ पदार्थ, चणा, वाटा हरभरा यांच्या उसळी ह्या गोष्टी टाळाव्यात. शक्यतो रात्री आहार कमी घ्यावा. ढगाळ असेल तेव्हा तर ह्या गोष्टींचे सेवन अजिबात करू नये. फळे वगैरे गोष्टी लव खराब होतात. भाज्या व पालेभाज्या स्वच्छ धुवून नीट पारखून घ्याव्यात.

आतापर्यंत आपण आहाराबद्दल पाहिले. आता आपण विहाराबद्दल पा वातावरण ढगाळ, पावसाळी असते. हवेत मध्येच गारवा असतो तर कधी उष्ण अशा वातावरणात पाऊस असतानां शक्यतो बाहेर पडू नये. पावसात भिजू नये. स्ना करताना गरम पाण्याचा वापर करावा. या प्रमाणे आहार-विहार ठेवल्यास वर्षाऋतु त्रास कमी होईल व तब्बेत पण चांगली राहील.

---

गुरुश्चेदुद्धरत्यज्ञम् आत्मीयात् पौरुषादृते।
उष्ट्रं दान्तं बलीवर्दं तत्कस्मान्नोद्धरत्यसौ ।।

योगवासिष्ठ-उपशम प्रकरण-४३.२

**शिष्याने स्वत: प्रयत्न केला नसतांनाही जर गुरु त्याचा अज्ञानातू उद्धार करू शकता, तर वठणीवर आणलेल्या उंट, बैल इत्यादि जनावरांनासुद्धा त्या गुरूने आत्मज्ञानी केले असते.**

**- योगवासिष्ठ**

---

साधनेच्या विश्वात

- चकोर आजगांवकर

# दिव्य जीवनाकडे - १३

(मागील अंकावरून पुढे चालू)

यामुळे तुकाराम भक्ती ही मुक्तीहून श्रेष्ठ मानतात. तर कबीर भक्तीशिवाय मुक्ती ही असे सांगतात. अहंकारच शुद्ध प्रभूमय झाल्यावर शुद्ध असा ''मी'' सगुण मेश्वर म्हणून हृदयात प्रगट होतो. अर्थात याला नाम, प्रेम, प्राणसंयम इत्यादींची ड असावी लागतेच. सगुणरूप ही भगवंताची लीलात्मक अशी एक कला आहे. त्यातूनच निर्गुणाचा मार्ग सोपा होतो. म्हणून सगुणतेस फार महत्त्व आहे. सगुणप्रेमास ''शांभव'' भाव किंवा ''विरलोदय'' भाव म्हणतात. हा वपूर्ण परमेश्वरी अहंकार असतो. परमेश्वरी प्रेमाने तो फुलतो. परमेश्वरी प्रेम ईश्वराचेच एक देणे आहे. ते समभावाने प्रसार पावते. समर्पणाने पाझरून वरूप होते. चित्तात ठसल्यावर ते चित्तचैतन्य बनते. याला प्रभूचे अवतरणहि णतात. आपल्या हृदयातून भक्त विश्वाचे हृदयात प्रवेशतो. विश्वच भक्ताचे हृदय ते, देवरूप बनते. भवसागरच भावसागर बनू लागतो. या भक्तिभावनेची सुरूवात द्धेतून होते, पण केवळ श्रद्धा म्हणजे भक्ति नव्हे. बुद्धीयुक्त स्थिर प्रेमभावना ही द्धा होय. भक्ती म्हणजे प्रेमाचा सहज ओघ. प्रेमभक्तियुक्त कर्म म्हणजे सहज संन्यास य. श्रद्धेने प्रेम करा, धैर्याने प्रारब्धाचे दुःख तात्पुरते भोगा, उपभोगहि भगवंतास र्पून भोगा. प्रतिमेमार्फतही परमेश्वर प्रेमाचा, उपहाराचा स्वीकार करू शकता. पण न यापूर्वीच विश्वात्मकाच्या वेधात गुंतले पाहिजे. भगवंत प्रेमाचा ऋणी आहे. भक्ताचा स आहे, हे विसरू नका. आध्यात्मिक साधनेची पूर्वतयारी म्हणजे मन, बुद्धी, अहंकार शुद्धी व संयम ही दोन अंगे यांचे या लेखांकात विशदीकरण केले. त्याचबरोबर द्ध मनात व संयमात भक्ती ओतल्यानंतर येणाऱ्या उच्च भावावस्थेचीहि थोडीशी ओळख करून दिली. याचा अधिक ऊहापोह आता करू.

## भाव, अहंकार, स्मरण, चिंतन यातून भावाची निर्मिती
## एक दिव्य मानसिक आलेख

साधकाच्या देह, मन, बुद्धी, अहंकार शुद्धींच्या व मनाच्या विषयाकडून परत फिरण्याच्या प्रक्रियेबद्दल मागील भागात ऊहापोह केला. ही साधनेची पूर्वतयारी होय.

यावाचून साधनेला सुरुवातहि करता येत नसते. म्हणून याचा वारंवार समग्रतेने विच केला. आता या पूर्वतयारीनंतरची शुद्ध मनात सगुणाच्या उपासनेची व संयमात भक्ती धारा प्रगट करण्याची प्रत्यक्ष साधना विचारात घेऊ या.

साधनेत भक्ताला स्वत:चा अहंकार शुद्ध करून व संयमाद्वारे ईश्वराची हृदया स्थापना करायची महत्त्वाची प्रक्रिया साधायची असते. **थोडक्यात व्यक्तिग भक्तिभावाकडून साधक विश्वात्मक शांभव वा विरलोदय भावाकडे संक्रमि व्हावयाचा असतो.** या ध्येयाकडे जाताना अनेक पायऱ्या चढाव्या लागतात. त्या थोडक्यात दिग्दर्शन करावयाचे आहे. शब्दरूप वैखरी वाणी ही मनाला उच्च अवस्थे न्यावयास मंत्र, नाम, इत्यादी वाहनाद्वारे मदत करते. शब्द इंद्रियातून स्फुरण्यापू तो 'मध्यमे'च्या रूपात असतो. शब्दहीन दिव्यभाव हा 'पश्यंती'द्वारा प्रगट हो आणि मौनात परावाणी प्रगट होते. या शब्दातून शब्दातीत दिव्य भावावस्थेकडे नेणा साधकाच्या आंतरिक अवस्था आहेत. **भक्ती ही तरंगात्मक असली तर वाहू शक नाही. ती प्रेमाची संतत धार बनावी लागते. तरच ती धारा राधा बनते.** भक्ती **कर्मसमर्पण व शरणांगतभाव मिळविल्यानंतर उत्कट भावभक्तीची एक दि धार बनते.** 'श्रीसाईगीतायना'त श्रीगुरुंना म्हटले आहे की ''हे जगद्गुरो, तुम्ही माझ्या भक्तीत अमृताची दिव्यधार ओता.'' बाबामहाराज आर्वीकरांनी अशा भक्तीला दिव्यामृताची धारा संबोधिले आहे. **'वैखरी'** वाणीतून वाहणारी शब्दरूप भक्ती **'पश्यंती'**च्या सीमेवर इंद्रियांचा प्रदेश सोडून रसात्मक संवेदना बनते. मधली अवस्था **'मध्यमे'**ची आहे. येथे भक्ती इंद्रियातून उत्कट भावरूपाने प्रगटण्याची द्रवावस्था निर्माण होते. प्रेम हे सामान्य स्वरूपात भक्ती नसते. पण प्रेम हे कोणतीहि अपेक्षा न ठेवता सहज उद्भवले की ते भक्तीत रूपांतरीत होते. भक्ती ही नैसर्गिक निरपेक्ष जिव्हाळ्याचा सहज सुंदर आविष्कार आहे. शुद्ध मन व बुद्धी यातून उद्भवणारे प्रेम भगवंताच्या संवित् म्हणजे संवेदन रूपाला जाऊन सरळ सरळ स्पर्श करते. हे मन विश्व मनास भिडल्यावर त्यास विश्वात्मक संवेदना (संवित्) लाभते. शुद्ध अहंकार हा आत्म्याकडून परमात्म्याचा अहंकार बनतो. अर्थात ही अंतिम प्रगत अवस्था सुरवातीस कल्पिता येणार नाही. माणसाचे चित्त हे मनाहून वेगळे आहे. **'चित्त'** म्हणजे स्मृतीचे ठसे. अहंकृत प्राण चैतन्याची वस्तूधर्म संवेदना साठवायची जाग असे संजीवनचिकित्साकार परांजपे व बाबामहाराज आर्वीकरहि म्हणतात. ही स्मृती जेथे कोठारात साठवितात ती बुद्धी होय. स्मृतींच्या मागे राहून ही बुद्धी मनाचे संचलन करते. **'बुद्धी'** म्हणजे अंत:करणाच्या वृत्तींची स्वत:च्या अस्तित्वाबद्दल जाणीव. हिला ज्ञानस्फुरणहि म्हणतात. **भूतकाळाचे आठवताना बुद्धी स्मृतीशी संलग्न होते व एक चित्तदशा बनते. ही बुद्धी संकल्प विकल्पाद्वारे भविष्यातहि गुंतते.** मन

**बुद्धी यापैकी बुद्धी मनाच्या मागे गेली की आपले विवेकी, समतोल ज्ञानरूप** मोडते. प्रत्यक्ष आनंदाचे दृश्य व अनुभव स्मृतिबद्ध वा संकल्पबद्ध चित्तामुळे बुद्धी खंडित करते असे कृष्णमूर्ती म्हणतात. ईश्वराकडे वळविलेली मनबुद्धी अहंकारालाहि ईश्वराचे रूप देते. चिंतनविहीन, स्मृतीविहीन, संकल्पविकल्पविहीन जाणीव ही ईश्वरी अहंकार बनते. मग मनबुद्धी स्वगृही पळते. ईशप्रेमामुळे आनंदभान किंवा स्वानंदाची स्फुरणा निर्माण होते. केवळ मनाच्या विकासामुळे बुद्धिवंत वर्ग हट्टी, एकांतिक, युयुत्सु बनला आहे. त्यामुळे दंभ, असत्य, फसवणूक, कुटिलता, अनिर्बंधता व शाब्दिकता येते. याऐवजी भक्ताची बुद्धी व मन ईश्वरी अहंकाराच्या दिव्य जीवनाच्या वाटेकडे मनबुद्धीच्या प्रकाशाला ईश्वराकडे वळविले की अहंकाराचा दिवा मालवतो व व्यापक जगद्भान, विश्वात्मक जाणीव उदित होते. **चित्त (स्मृतीबद्ध), बुद्धी व अहंकृत जाणीव प्रेमात बुडविली की मन स्थिर होते**. या प्रेमात मन व अंतर्दृष्टी स्थिर होण्यास प्रेममुद्रा म्हणतात. ही काही त्राटकासारखी कृत्रिम मुद्रा नाही. तर ती सहज प्रगट शांभवी मुद्रा आहे. या प्रेम मुद्रेत दृष्टी स्थिर असते, चित्त शुद्ध असते, प्राण निश्चल होतात.

**'स्मरण'** व **'चिंतन'** या भक्तीतील मनाच्या दोन प्रक्रिया आहेत. **''स्मरण''** प्रथम रूप व नामाची अट्टाहासाने केलेली कवायत असते. हा खास प्रयत्न असतो. स्मरण हे वेधरूपाने स्थिर झाले की खरेखुरे सहज स्मरण बनते. तोपर्यंत कृत्रिम असते.

**चिंतन** हा ध्यास आहे. सहज विचार आहे. प्रेमात बुडलेला ध्यास धरल्यावर चा मी होतो, अहंचा सोऽहं बनतो. आपण अहंकारशून्य न बनता ईश्वराहंकार बनतो. कर्म निष्कर्म बनते. ईश प्रेमात साधक वर्ततो. दैवावर न अवलंबिता देवावर अवलंबितो. त्यामुळे संचिताचा उदय थांबतो. फक्त प्रारब्ध भोगावे लागते. ''संचित प्रारब्ध क्रियामाण। अवघा झाला नारायण'' (तुकाराम). काल व कर्मचक्र तुटते. चित्ताकाश चिदाकाश बनते. प्रेमभावाच्या या हिंदोळ्यावर भक्त झोके घेत असतानाच ध्यानरूपी निद्रा त्याला सहज येते, असे बाबामहाराज आर्वीकरांनी समर्थपणे शब्दात वर्णिलेले आहे.